❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | रविवार, दि. ०२ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २१८ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

# दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार






# अजित डोवाल यांचे राष्ट्रसेवेतील योगदान प्रेरणादायी : अमित शाह

■ अजित डोवाल यांचा सन्मान हा राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रदान

■ पुणे (दै. संध्या)

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा देत राष्ट्रवाद, शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक जागृतीचा भक्कम पाया रचला. “स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच” हा त्यांचा विचार आजही प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देत असून विकसित आणि सक्षम भारताच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक ठरत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. लोकमान्य टिळक यांच्या 106 व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित समारंभात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रतिष्ठेचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार तथा पुरस्काराचे मानकरी अजित डोवाल, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक, डॉ. गीताली टिळक, डॉ. प्रणिती टिळक आदी उपस्थित होते.

अमित शाह म्हणाले, लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यलढ्याला जनआंदोलनाचे स्वरूप देत सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवांच्या माध्यमातून सांस्कृतिक राष्ट्रवादाची भावना जनमानसात रुजविली. ‘केसरी’ आणि ‘द मराठा’ या वृत्तपत्रांद्वारे निर्भीड पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला, तर राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातून देशभक्त नागरिक घडविण्याचे ऐतिहासिक कार्य केले. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या कार्याचा गौरव करतांना श्री. शाह म्हणाले, देशाच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षेला बळकटी देण्यात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. गुप्तचर यंत्रणेत अनेक आव्हानात्मक मोहिमा यशस्वीपणे पूर्ण करत त्यांनी राष्ट्रसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि निर्णायक बनविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित अनेक धोरणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीत त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी त्यांची झालेली निवड अत्यंत योग्य असून त्यांच्या कार्यातून देशातील तरुणांना राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळेल, असा विश्वासही शाह यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी अजित डोवाल यांची झालेली निवड ही राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव आहे. 2014 पासून राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून त्यांनी भारताच्या सुरक्षा धोरणाला नवे परिमाण दिले. त्यांच्या ‘प्रोॲक्टिव्ह डिटरन्स’ च्या संकल्पनेमुळे भारताची सुरक्षा रणनीती अधिक प्रभावी झाली आहे. भारत आता केवळ हल्ले सहन करणारा देश नसून आवश्यकतेनुसार ठोस प्रत्युत्तर देण्याची क्षमता असलेले सामर्थ्यवान राष्ट्र बनल्याचे त्यांनी नमूद केले. लोकमान्य टिळकांनी 1857 नंतर भारतीय समाजात स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना चेतवून राष्ट्रवादाला नवी दिशा दिली, ते भारतीय राष्ट्रवादाचे जनक होते.

टिळकांनी इंग्रजी साम्राज्याच्या काळात भारतीयांची मानसिकता बदलत त्यांच्या मनात देशभक्तीच्या भावनेचे रोपण केले. सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंतीच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्याचे कार्य त्यांनी केले. राष्ट्रहितासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या व्यक्तीलाच लोकमान्य टिळक यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे उचित असून अजित डोवाल हे त्या परंपरेला साजेसे व्यक्तिमत्त्व असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

# अभिजित दिपके यांची प्रकृती बिघडली

नागरिकांशी संवाद साधताना मळमळ आणि उलटीचा त्रास, भेट सोडून परतले

■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

‘कॉकरोच जनता पार्टी’चे नेते अभिजीत दिपके यांच्या आरोग्याबाबत एक महत्त्वाची आणि काळजी वाढवणारी माहिती समोर आली आहे. नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमादरम्यान दिपके यांची प्रकृती अचानक खालावली. संवाद सुरू असतानाच त्यांना तीव्र मळमळ आणि उलटीचा त्रास होऊ लागल्याने, त्यांना हा कार्यक्रम अर्धवट सोडून घरी परतावे लागले.

मिळालेल्या माहितीनुसार, जंतर-मंतर येथील तीव्र आंदोलनानंतर अभिजित दिपके यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते. काही दिवसांत त्यांच्या तब्येतीत सुधारणा झाली होती. मात्र, आज पुन्हा एकदा त्यांची प्रकृती बिघडल्याचे पाहायला मिळाले. नागरिकांना न भेटताच त्यांना माघारी फिरावे लागल्याने उपस्थितांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले.

सध्या डॉक्टरांचे एक पथक त्यांच्या घरीच त्यांच्यावर उपचार करत असून, त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून आहे. वैद्यकीय तपासणीनंतर पुढील निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती आहे. अभिजित दिपके यांनी नीट पेपरफुटीविरोधात पुकारलेल्या आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यामुळे



शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. नवी दिल्ली येथील जंतर-मंतरवरील आंदोलन संपताच अभिजित दिपके त्यांच्या स्वगृही छत्रपती संभाजीनगरमध्ये परतले आहेत. सध्या त्यांचा येथेच मुक्काम आहे. नागरिकांच्या भेटीगाठी आणि घरात आई-वडिलांना वेळ देण्यात ते सध्या व्यस्त आहेत. दिपके शिक्षणासाठी अमेरिकेत होते. मात्र, न्यायाधीश सूर्यकांत यांच्या वक्तव्यानंतर कॉकरोच पार्टीची अचानक केलेली स्थापना आणि नंतर नीट आंदोलनामुळे ते मायदेशी परतलेत.

# पुण्यात केंद्रीय गृहमंत्र्यांच्या विरोधात काँग्रेसचे आंदोलन




■ पुणे (दै. संध्या)

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह शनिवारी शहरात आलेले असताना, नुकतेच दिल्लीत विद्यार्थी आंदोलनात झालेल्या लाठीमारच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यावतीने सातारा रोडवरील उत्सव चौकात आंदोलन करण्यात आले. तर, दुसरीकडे युवक काँग्रेस आणि काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांना मध्यरात्रीच पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले होते. १६ तासांनंतर त्यांना सोडण्यात आले. अमित शाह यांच्या पुणे दौऱ्यानिमित्त काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी आंदोलनाची परवानगी पुणे पोलिसांकडे मागितली होती. पोलिसांनी कार्यक्रम स्थळापासून सुमारे २ किमी अंतरावर आंदोलन करण्यास परवानगी दिल्याने सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांसमोर आले नाहीत. आंदोलनादरम्यान काँग्रेसचे पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन केल्याचे सांगितले. यावेळी पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चौधरी, महापालिकेतील गटनेते रामचंद्र कदम, जिल्हाध्यक्ष लहू निवंगुणे, नगरसेवक अरविंद शिंदे, अविनाश साळवे, रफिक शेख, साहिल केदारी, विशाल मलके आणि अश्विनी लांडगे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यावेळी २ पोलिस उपायुक्त, २ सहायक आयुक्त, २० अधिकारी आणि १५० कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त नियुक्त करण्यात आला होता. दरम्यान, या उत्सव चौकात काँग्रेस पक्षाच्या आंदोलनापूर्वी वंचित बहुजन आघाडीतर्फेदेखील आंदोलन करण्यात आले. आंदोलक त्यांना ठरवून दिलेली जागा सोडून अचानक सातारा रोडवर येऊन बसल्याने काहीवेळ वाहतूककोंडी झाली. त्यानंतर पोलिसांनी आंदोलकांना त्यांच्या वाहनात बसवून पोलिस ठाण्यात नेले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या पुणे दौऱ्यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी युवक काँग्रेस व शहर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांवर पोलिस प्रशासनाने प्रतिबंधात्मक कारवाई करत मध्यरात्री त्यांच्या घरातून ताब्यात घेतले. या पदाधिकाऱ्यांना तब्बल १६ तास पोलिसांच्या ताब्यात ठेवण्यात आले. तसेच, त्यांचे मोबाइलदेखील पोलिसांच्या ताब्यात होते अशी माहिती समोर आली आहे.

### भाजपचे देखील आंदोलन

उत्सव चौकात काँग्रेसकडून आंदोलन सुरू असतानाच, भाजपने काँग्रेस भवनाबाहेर आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी परिसरात मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. भाजपच्या पदाधिकाऱ्यांसोबत आंदोलकांनी गृहमंत्री अमित शाह यांच्या समर्थनार्थ पोस्टरबाजी केली. राष्ट्ररक्षक, चाणक्य अशाप्रकारचे बॅनर आंदोलनावेळी दर्शविण्यात आले.

## थोडक्यात...

### भाग्य विधात्यांना झुरळ म्हणता : उद्धव ठाकरे

मुंबई : दैनिक संध्या

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच त्यांना शिवीगाळ करणाऱ्या आंदोलक तरुणांना माफ केल्याचे एका व्हिडिओद्वारे म्हटले होते. यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान मोदींवर अत्यंत तीव्र शब्दांत हल्लाबोल केला आहे. "अतिरेक्यांशी बोलायला तुम्हाला काही वाटत नाही, पण देशाच्या भाग्यविधात्यांना तुम्ही झुरळ आणि भरकटलेले म्हणता," अशी घणाघाती टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. याचबरोबर, आमदार आदित्य ठाकरे यांनीही 'एक्स' (ट्विटर) वरून दिल्लीतील विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष कारवाईवरून केंद्र सरकारला घेरले आहे. पंतप्रधान मोदींच्या 'माफी'च्या विधानाचा समाचार घेताना उद्धव ठाकरे म्हणाले, "तुम्ही आधी या मुलांना झुरळ म्हटले, त्यांना भरकटलेले म्हटले. आता सांगताय की माफ केले, पण ही मुले तुम्हाला माफ करतील का? मी जेव्हा आंदोलक विद्यार्थ्यांना भेटायला गेलो होतो, तेव्हा कुणाचे हात तर कुणाचे पाय फ्रॅक्चर झाले होते. एका तरुणीने उद्वेगाने सांगितले की तिचे कपडे फाडले गेले. त्या मुलांनी जे भोगले आहे, ते ऐकूनच अंगावर शहारे येत होते." उद्धव ठाकरे म्हणाले की, विद्यार्थ्यांवर ज्या पद्धतीने कारवाई करण्यात आली, ती अत्यंत धक्कादायक होती. "विद्यार्थ्यांवर खिळे लावलेल्या काठ्यांनी हल्ले करण्यात आले, पेलेट गनचा वापर झाला, अश्रुधूर सोडण्यात आला. काही विद्यार्थिनींशी गैरवर्तन झाल्याचे व्हिडिओ समोर आले. नीट परीक्षा पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांचीही सरकारने माफी मागितली पाहिजे," असे ते म्हणाले.

### भाई जगतापांवर गुन्हा

मुंबई : दैनिक संध्या

दिल्ली पोलिसांचे डीसीपी सुमीत झा यांच्या राजीनाम्याचा दावा करणारा 'एआय-जनरेटेड' बनावट व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करणे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते भाई जगताप यांना चांगलेच भोवले आहे. जनतेची दिशाभूल केल्याच्या आरोपावरून त्यांच्याविरोधात महाराष्ट्र सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. भाजपचे सोशल मीडिया सहसंयोजक निखिल भामरे यांनी दिलेल्या तक्रारीनंतर महाराष्ट्र सायबर पोलिसांनी ही धडक कारवाई केली आहे. महाराष्ट्र सायबरच्या नोडल सायबर पोलीस ठाण्यात भाई जगताप यांच्यावर FIR नोंदवण्यात आला आहे. हा गुन्हा भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 353(2) तसेच माहिती तंत्रज्ञान (IT) अधिनियमातील संबंधित कठोर तरतुदींनुसार दाखल करण्यात आला आहे.

### साक्षीदारांवर दबाव टाकण्याचा प्रश्नच नाही

मुंबई : दैनिक संध्या

डोंबिवलीतील डॉक्टर मारहाण प्रकरणातील आरोपी आणि शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयात जामिनासाठी विनंती केली. 'आपण सध्या तुरुंगात असल्याने पीडित आणि साक्षीदारांवर दबाव टाकण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, तसेच पोलिसांचा तपासही बहुतांश पूर्ण झाला आहे. त्यामुळे आवश्यकता वाटल्यास चार-सहा आठवडे राज्याबाहेर राहण्याची अट घालून जामीन मंजूर करावा,' असा युक्तिवाद त्यांनी केला.

# आरोग्यासाठी समस्या

■ पुणे (दै. संध्या)

प्रतिजैविकांचा (अँटिबायोटिक्स) अविवेकी वापर आणि मुदतबाह्य अथवा न वापरलेल्या औषधांची अयोग्य विल्हेवाट यामुळे प्रतिजैविक प्रतिरोधकता वेगाने वाढत आहे. ही भविष्यातील सार्वजनिक आरोग्यासाठी गंभीर समस्या ठरणार आहे. त्यामुळे शासन, वैद्यकीय यंत्रणा, डॉक्टर आणि नागरिकांनी एकत्रितपणे जनजागृती करण्याची गरज असल्याचे राज्याचे माजी प्रधान सचिव तथा माजी अन्न व औषध प्रशासन आयुक्त महेश झगडे यांनी केले. महापालिका, सेंटर फॉर हेल्थ रिसर्च अँड इनोव्हेशन, सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने न वापरलेल्या व मुदतबाह्य प्रतिजैविकांच्या सुरक्षित विल्हेवाटीबाबत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. स्वारगेट येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनात झालेल्या कार्यशाळेत महापालिकेत ७६ वैद्यकीय अधिकारी सहभागी झाले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सहायक आरोग्य अधिकारी तथा एमएसयूच्या प्रभारी अधिकारी डॉ. वैशाली जाधव, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाचे सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. विशाल कुलकर्णी, सामाजिक संस्थेचे वरिष्ठ सल्लागार डॉ. सचिन गुप्ते, डॉ. सुमित देवरे, माहिती, शिक्षण व संवाद ब्युरोचे डॉ. संजय जठार, डॉ. लता घनश्यामनानी आदी उपस्थित होते. झगडे म्हणाले, प्रतिजैविकांचा अविवेकी वापर हा मानवतेविरुद्धचा अपराध आहे. योग्य वेळी उपाययोजना केल्या नाहीत, तर भविष्यात सामान्य संसर्गावरही औषधे परिणामकारक ठरणार नाहीत. शस्त्रक्रिया आणि इतर वैद्यकीय उपचारही धोक्यात येऊ शकतात.

# तुमच्या ट्रोल आर्मीला आधी आवरा : राज ठाकरे


### मोदींवरील चित्रपट करणाऱ्या अभिनेत्यांना ठाकरेंचा टोला

■ मुंबई (दै. संध्या)

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या 20 व्या वर्धापन दिन सोहळ्यात केंद्र सरकार, भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्य सरकारवर निशाणा साधला. जेन-झी पिढीच्या प्रश्नांपासून शिक्षणव्यवस्था, ट्रोल संस्कृती, बेरोजगारी आणि चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्यांपर्यंत अनेक मुद्द्यांवर त्यांनी परखड भूमिका मांडली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच एका व्हिडिओत तरुणांनी वापरलेल्या चुकीच्या भाषेवर चिंता व्यक्त करत त्यांना माफ केल्याचे म्हटले. यावर बोलताना राज ठाकरे म्हणाले की, कुणाबद्दलही खालच्या थराची भाषा वापरणे चुकीचेच आहे, मान्य आहे. पण, याची सुरुवात गेल्या १२ वर्षांत भाजपच्याच ट्रोल आर्मीने केली. नेहरू, इंदिरा गांधींपासून ते आमच्यापर्यंत सर्वांना ट्रोल करण्यासाठी प्रत्येक राज्यात ही लोकं बसवली आहेत. पंतप्रधानांना माझे सांगणे आहे की, दुसऱ्यांनाही आया असतात. त्यामुळे तुमच्या पक्षातील लोकांनाही मर्यादा पाळायला सांगा. तुम्ही मुलांना माफ केले, पण जंतरमंतरवर विद्यार्थ्यांची डोकी फोडण्याचे आदेश देणारे कधी माफी मागणार? असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

राज ठाकरे म्हणाले, रस्त्यावर उतरलेले विद्यार्थी केवळ 'नीट' पेपरफुटीमुळे संतापलेले नाहीत, तर ते केवळ एक निमित्त आहे. या रौद्र रूपामागे आजूबाजूला साचलेले निराशाजनक वातावरण कारणीभूत आहे. मुलांना खेळायला



मैदाने नाहीत, नोकऱ्या नाहीत, सर्व कंपन्या खासगी उद्योगपतींच्या घशात घातल्या जात आहेत आणि देशात फक्त निवडणुका आणि आमदार-खासदार फोडण्याचे राजकारण सुरू आहे,अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

राज ठाकरे म्हणाले, आम्ही टेलिग्रामपासून ते थेट इन्स्टाग्रामपर्यंतचा बदलता काळ पाहिला आहे. 'Gen-Z' म्हणजे केवळ मुंबई-पुण्यात राहून इंग्रजी बोलणारी मुले नव्हेत, तर ही १९९७ नंतर जन्मलेली पिढी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातही आहे. जुन्या कल्पना सोडून त्यांच्या अपेक्षा समजून घेण्याची आज नितांत गरज आहे." राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर राज ठाकरेंनी निशाणा साधला. लहानपणी बुद्धी तल्लख व्हावी म्हणून डोक्याला तेल लावायला सांगायचे. एका माणसाने आयुष्यभर तेल चोपडले, पण बुद्धी काही आली नाही, असा टोला त्यांनी लगावला. 'दगडावरचे ठसे आधारशी लिंक करणार' या चंद्रकांत पाटलांच्या विधानावर टीका करत ते म्हणाले, "मला चंद्रकांत पाटलांच्या मेंदूवरचे फिंगरप्रिंट पाहायचे आहेत. असे मंत्री राज्याच्या नशिबी आल्यावर तरुणांचा पारा चढणार नाही तर काय होईल?"

यावेळी राज ठाकरेंनी अभिनेता विवेक ओबेरॉय आणि आर. माधवन यांच्यावरही टीका केली. पंतप्रधान मोदींवर चित्रपट काढणारा विवेक ओबेरॉय आणि आर. माधवन हे दोघेही दुबईत स्थायिक आहेत. "जर तुमचे देशावर आणि पंतप्रधानांवर इतकेच प्रेम आहे, तर मग परदेशात का राहता? केवळ प्रायोजित चित्रपटात काम करण्यासाठी भारतात यायचे आणि पुन्हा निघून जायचे, हे योग्य नाही," असे ते म्हणाले. देशाच्या शिक्षण व्यवस्थेवर भाष्य करताना त्यांनी आकडेवारी मांडली. २००४ मध्ये देशात शिक्षणावर ३.४ टक्के खर्च होत होता, तो आज घटून २.८ टक्क्यांवर आला आहे. देशाचे भवितव्य घडवायचे असेल, तर शिक्षणावरील खर्च वाढवला पाहिजे, अशी अपेक्षा राज ठाकरे यांनी व्यक्त केली. याच मेळाव्यात मनविसेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांनीही राज्य सरकारच्या धोरणांवर सडकून टीका केली.

# बॉम्बचा कागद मिळाल्याने खळबळ

■ अयोध्या (दै. संध्या)

उत्तर प्रदेशातील अयोध्या जिल्ह्यात असलेल्या राजर्षी दशरथ मेडिकल कॉलेजमधून एक धक्कादायक आणि गंभीर घटना समोर आली आहे. शनिवारी सकाळी महाविद्यालयाच्या एक्स-रे विभागातील एका ड्रॉवरमधून बॉम्ब बनवण्याची कथित पद्धत असलेले एक संशयास्पद दस्तऐवज जप्त करण्यात आले. हे उघडकीस येताच, महाविद्यालय प्रशासनाने तात्काळ पोलिसांना माहिती दिली, ज्यामुळे सुरक्षा यंत्रणा आणि पोलिसांनी तपास सुरू केला. या घटनेनंतर तीन विद्यार्थ्यांना ताब्यात घेण्यात आले असून चौकशी केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना शनिवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास घडली. एक्स-रे विभागाचे प्रभारी त्यांच्या नियमित कामासाठी आले होते. त्यांनी एक ड्रॉवर उघडला आणि त्यांना धक्काच बसला. आतमध्ये एक कागद होता, ज्यामध्ये बॉम्ब बनवण्याची संपूर्ण पद्धत आणि त्याची रचना असल्याचा दावा करण्यात आला होता. प्रभारींनी संशयास्पद दस्तऐवजाबद्दल वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य आणि मुख्य वैद्यकीय अधीक्षक, डॉ. अरविंद सिंग यांना तात्काळ माहिती दिली. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून, सीएमएस डॉ. अरविंद सिंग यांनी तात्काळ स्थानिक पोलिसांना बोलावून त्यांना संपूर्ण घटनेची माहिती दिली. प्राथमिक तपास आणि चौकशीतून असे समोर आले की, शुक्रवारी रात्रभर एक्स-रे रूममध्ये एक प्रथम वर्षाचा विद्यार्थी कर्तव्यावर होता. या विद्यार्थ्याचे नाव सरफराज असून तो उत्तर प्रदेशातील बलरामपूर जिल्ह्याचा रहिवासी आहे.

## संपादकीय

# असंसदीय शब्दांचं दंडकारण्य

**संसदेत शब्द वगळले जातात; पण गोंधळ, घोषणाबाजी आणि उत्तरदायित्वाचा अभाव या बाबीही 'असंसदीय' मानण्याची वेळ आली आहे.**

सध्या सुरू असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी नुकतेच पुन्हा बोलले आणि 'इडियट' व 'अंधभक्त' या दोन असंसदीय शब्दांची देणगी संसदेला देऊन मोकळे झाले! त्यानिमित्ताने संसदीय आणि असंसदीय शब्दांबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली. गांधी हे शब्द ज्यांना उद्देशून बोलले, त्यामुळे सत्तारूढ भाजप सदस्य भडकले नसते तरच नवल. यातून गांधी यांचा हेतू साध्य झाला, तरी लोकसभेचे कामकाज पाण्यात जाईल, यावर शिक्कामोर्तब झाले. कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान शुक्रवारी जेमतेम अर्ध्या मिनिटात तीनदा विरोधकांना 'सडकछाप' म्हणाले. त्यांचे ते सुविचार कामकाजातून हटवले जाणार का, हे सोमवारी समजेल. संसदीय कामकाजाची विशिष्ट भाषा आहे. २००९ ते २०१४ या काळात भाजपचाही गोंधळ सर्वोच्च पातळीवर होता. पण तेव्हा सुषमा स्वराज, अरुण जेटली या विरोधी पक्षनेत्यांना शब्दांचे, भाषेचे भान असे. खुद्द सोनिया गांधी, लालकृष्ण अडवाणीही मोजकेच, पण थेट आणि भेदक बोलत. आता सव्वादोन दशकांपेक्षा जास्त संसदीय अनुभव असलेला एखादा सदस्य बेधडक असंसदीय भाषा बोलतो. तो नेता असला की जास्त गदारोळ होतो. अध्यक्ष घंटानाद करतात, मग दुसऱ्या बाजूचे सदस्य घोषणाबाजी करतात, कामकाजातून ते शब्द वगळले जातात. पण मंत्र्यांना विचारलेले तारांकित प्रश्न अनुत्तरित राहिले, बेरोजगारीवरची चर्चा थांबली, महागाई किंवा अडचणीच्या मुद्द्यांवर सरकार मौनात गेले, तेव्हा 'हे खरे असंसदीय' असा विचार कोणाच्या मनात येतो का? संसदीय अधिवेशन तुमच्या-आमच्या कराच्या पैशातून भरते. त्यातल्या गोंधळाबद्दल कोणालाच काही वाटेनासे होते, तेव्हा संसद भवनावरचे सिंहही केविलवाणे भासतात.

असंसदीय शब्दांचा इतिहास जुनाच. स्वातंत्र्यानंतर लोकसभा आणि राज्यसभेच्या अध्यक्षांनी वेळोवेळी काही शब्द सभागृहाच्या प्रतिष्ठेला बाधक ठरवून कामकाजातून वगळले. त्या निर्णयांचे संकलन लोकसभा सचिवालयाने केले. १९९९ नंतर २००४ मध्ये प्रकाशित झालेली 'Unparliamentary Expressions' ही सुधारित आणि विस्तारित आवृत्ती आणि २०१४-१५ मधील असंसदीय शब्दावलीही उपलब्ध आहे. याच्या प्रस्तावनेत स्पष्ट नमूद केले आहे ,की हा कायमस्वरूपी बंदी घातलेल्या शब्दांचा शब्दकोश नसून, विविध संसदीय निर्णयांचा संदर्भग्रंथ आहे. २०१४-१५ मधल्या असंसदीय शब्दांच्या ३९ पानी पुस्तिकेच्या जन्माला ज्या घटना कारणीभूत झाल्या, त्यातली एक रंजक. तत्कालीन शिवसेना सदस्य हेमंत गोडसे एकदा अस्वस्थपणे लोकसभाध्यक्षांच्या दालनाबाहेर थांबले होते. 'काय झाले अप्पा, सुमित्राताई महाजनांकडे काही विशेष काम?' असे पत्रकारांनी विचारल्यावर कामकाज पुस्तिका दाखवून ते म्हणाले, 'माझे नावच छापले जात नाही यात. मी इतके मुद्दे मांडतो, प्रश्न विचारतो; पण माझे नावच गाळतात.' त्या वेळी सचिवालयाकडून सांगण्यात आले, की गोडसे हा शब्दच असंसदीय ठरवला गेला आहे! हे ३० जानेवारी १९४८ च्या 'दिनवैशिष्ट्या'मुळे झाले की कसे, हे समजले नाही. आपल्याकडे संदर्भापेक्षा राजकारणाला अधिक किंमत आहे. पण ही यादी चाळली की गंमत वाटते. शेकडो शब्द त्यात आहेत. पण त्यापैकी एकाही शब्दावर कायमस्वरूपी बंदी नाही. त्या त्या वेळी अध्यक्षांना तो शब्द ज्या संदर्भात वापरला गेला, त्यानुसार निर्णय घेण्याचा अधिकार घटनाकारांनी दिला आहे. २०२२ मध्ये लोकसभा सचिवालयाने अद्ययावत सूची प्रसिद्ध केली आणि अशी हवा निर्माण झाली की 'भ्रष्ट', 'तानाशाह', 'ढोंगी', 'शर्म करो' आदी शब्द वापरण्यावरच बंदी घातली. विरोधक संतापले, समाजमाध्यमांवरच्या विद्यापीठांनी त्याला 'शब्दबंदी' नाव दिले. मग लोकसभा सचिवालयाने स्पष्ट केले की कोणताही शब्द कायमस्वरूपी असंसदीय नसतो; अंतिम निर्णय अध्यक्षच घेतात. ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात एकदा एक पंतप्रधान विरोधकांना ते का भुंकत आहेत, असे इंग्रजीत म्हणाले. त्याचे तत्काळ हिंदी भाषांतर झाले.

## संस्कृत सुभाषित

सुखा अंग देऊ नये । प्रयत्न पुरुष सांडू नये

अर्थ : धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थाची प्राप्ती हवी तर परिश्रम केलेतच पाहिजे.

## गुरु वचन

### जर मनच अशुद्ध तर...

खूप जुनी गोष्ट आहे. एकदा संत कबीर बसले होते. त्यांच्याकडे एक व्यापारी धावत आला. त्याने कबीरांना विनंती केली, 'मला तुम्हाला माझा गुरू करायचे आहे, तुम्ही मला गुरुमंत्र द्या' तेव्हा संत कबीरांनी त्याला पैसे दिले आणि सांगितले आधी तू पटकन जाऊन दूध घेऊन ये, मग मी तुला गुरुमंत्र देतो.

त्या व्यापाऱ्याला खूप घाई होती. तो तडक धावत गेला आणि त्याने दूध कबीरांना आणून दिले. कबीरांनी त्याला एक भांडे दिले आणि सांगितले, हे दूध या भांड्यात ओत. त्याने ते भांडे घेतले, त्यात प्रचंड घाण साचली होती. त्या व्यापाऱ्याने कबीरांना ही बाब सांगितली. ते म्हणाले, बघ जर तू या खराब भांड्यात दूध टाकायला तयार नाहीस तर, मग मी तुझ्या अशुद्ध मनात राम नावाचा मंत्र कसा देऊ? '

कबीरांनी म्हटलेले वाक्य किती खरे आहे बघा? जर तुमचे मनच शुद्ध नाही तर तुम्ही देवाचे दर्शन घेतले काय, किंवा संत सानिध्यात राहिलात काय, त्याचा काय परिणाम होणार?

संतांनीही हेच सांगितले आहे. भलेही तुम्ही पुजा नका करू, परंतु तुम्ही तुमचे आचरण, आणि मन शुद्ध ठेवा. आपण इतरांना एखाद्या कामासाठी दोष देत असतो, पण त्याची त्यामागची भूमिका समजून घेणे गरजेचे असते. आणि आपण नेमके या उलटच करतो.

आपल्या दैनंदिन कामात आपण अनेकांना भेटत असतो, यात प्रत्येक व्यक्ती आपल्याला चांगलीच भेटते असे नाही, तर प्रत्येकाचा स्वभाव वेगवेगळा असून शकतो. त्यांच्या स्वभावानुसार त्यांना काम देणे गरजेचे आहे.

बदलायची असतील तर त्यांची मने बदलण्याचा प्रयत्न तुम्ही करा. त्यांच्या मनातील कटुता कमी करा. कारण कबीरांनी म्हटल्याप्रमाणे, खराब भांड्यात ज्या प्रमाणे तुम्ही दूध नाही टाकणार त्या प्रमाणेच एखाद्याचे मन परिवर्तन झाल्याशिवाय तुम्ही त्याला बदलू नाही शकणार.

## उपदेशकथा

### भलत्या ठिकाणी भाषण

हिमालयातले दोन हंस व कासव यांची एकदा मैत्री झाली. हंसांकडून हिमालयाचं वर्णन ऐकून कासव म्हणालं, बाबांनी मला घेऊन चला की रे तुमच्या बरोबर हिमालयात हंस म्हणाले, तुला चोचीनं पकडता येणार नाही. म्हणून एका काठीला तू मध्ये दातांनी धर. आम्ही दोघे काठी पकडू. मात्र तोंड उघडशील तर काठी सुटेल आणि तू प्राण गमावशील हे ध्यानात ठेव. कासवाने काठीचा मध्यभाग दातांनी पकडला व ती काठी घेऊन हंस उडत चालले. कासवालादेखील हे सुंदर हंस आपल्याला नेतात याचा अभिमान वाटला. एका शहरावरून हे तिघे चालले असता खेळणाऱ्या मुलांनी ते दृश्य पाहिलं. मुलं ओरडून म्हणाले, अरे पहा ते देखणे हंस आणि मध्ये लटकतयं कुरूप ओबडधोबड कासव. कासवाला संताप आला त्या मुलांना उद्देशून बोलण्यासाठी कासवानं तोंड उघडलं मात्र ते खाली कोसळून गतप्राण झालं.

कथा उपदेश : अयोग्य ठिकाणी संभाषण करून आपला नाश करून घेऊ नये.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:बालव २३:१५:३४ |
| २ ऑगस्ट २०२६ | सूर्य:कर्क |
| रविवार | चन्द्र:मीन१५:२६:२८ |
| विक्रम संवत्– २०८२ | हिजरी सन् – १४४८ |
| आषाढ शके | मुस्लिम मास – सफर |
| संवत्– १९४८ | तारीख – १८ |
| संवत्सर –पराभवनाम | विशेष |
| अयन– दक्षिणयन | संकष्ट चतुर्थी |
| मास– आषाढ | चंद्रोदय ९.३३ |
| ऋतु– सौर वर्षा | मुंबई २१.३३ |
| कृष्ण पक्ष | अकोला २१.१९ |
| तिथि:चतुर्थी २३:१५:३४ | अमरावती २१.१६ |
| नक्षत्र:पूर्वाभाद्रपद २१:३६:४८ | अहमदनगर २१.३७ |
| | अलिबाग २१.३७ |
| योग:अतिगण्ड २२:२९:०८ | औरंगाबाद २१.२६ |
| करण:बव ११:१५:०६ | कोल्हापुर २१.३१ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०२८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 7 | | 5 | | | | 2 |
| | 2 | 1 | 4 | 9 | | | 3 | |
| | | 4 | | 8 | | | | |
| | 5 | | 8 | 1 | | | | 9 |
| 3 | 7 | 6 | | | | 2 | 1 | 8 |
| 1 | | | | 2 | 3 | | 6 | |
| | | | | 6 | | 9 | | |
| | 8 | | | 3 | 9 | 1 | 4 | |
| 2 | | | | 7 | | 6 | 8 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०२७ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 3 | 9 | 8 | 2 | 1 | 4 | 6 | 7 |
| 1 | 6 | 4 | 7 | 3 | 5 | 8 | 2 | 9 |
| 2 | 8 | 7 | 6 | 4 | 9 | 3 | 1 | 5 |
| 6 | 4 | 3 | 5 | 8 | 7 | 1 | 9 | 2 |
| 9 | 2 | 8 | 1 | 6 | 3 | 7 | 5 | 4 |
| 7 | 1 | 5 | 2 | 9 | 4 | 6 | 3 | 8 |
| 3 | 5 | 2 | 4 | 1 | 8 | 9 | 7 | 6 |
| 4 | 9 | 6 | 3 | 7 | 2 | 5 | 8 | 1 |
| 8 | 7 | 1 | 9 | 5 | 6 | 2 | 4 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७९० – अमेरिकेतील पहिली जनगणना सुरू.
- १८६९ – जपानमधील वर्णसंस्थेचा शेवट.
- १९३४ – ॲडोल्फ हिटलर जर्मनीच्या फ्युररपदी.
- १९४५ – दुसरे महायुद्ध – पॉट्सडॅम संमेलनाची सांगता.
- १९५३ – सोविएत रशियाने हैड्रोजन बॉम्बचा स्फोट केला.

### राष्ट्रीय

- १६७७ – छत्रपती शिवाजी महाराज यांनी वृद्धालम् येथे डच प्रतिनिधींशी बोलणी केली.
- २००४ – शिबू सोरेन यांचा जामीनअर्ज फेटाळला.
- २००८ – ५ ऑगस्ट रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना ठार मारण्यासंबंधीची धमकी असलेल्या मजकूर आकट या संकेतस्थळावर काही अज्ञात इसमांनी प्रसारीत केल्याचे उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली.

### जन्म

- १६९६ – महमूद पहिला, ओट्टोमन सम्राट.
- १८६८ – कॉन्स्टन्टाईन पहिला, ग्रीसचा राजा.
- १८६१ – प्रफुल्लचंद्र रे, भारतीय रसायनशास्त्र.
- १९२८ – माल्कम हिल्टन, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९३२ – पीटर ओटूल, आयरिश अभिनेता.
- १९५८ – अर्शद अय्युब, भारतीय क्रिकेट खेळाडू.
- १९७६ – मोहम्मद झहीद, पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू.

### निधन

- ६८६ – पोप जॉन पाचवा.
- ११०० – विल्यम दुसरा, इंग्लंडचा राजा.
- १५८९ – हेन्री तिसरा, फ्रांसचा राजा.
- १६११ – केटो कियोमासा, जपानी सामुराई.
- १९२३ – वॉरेन हार्डिंग, अमेरिकेचा २९वा राष्ट्राध्यक्ष.

## : SMS :

Mummy: Beta exam me kya likha?
Chintu: Mummy, saare sawaal aate the par jagah kam pad gayi

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २५.४ | २३.९ |
| अहमदनगर | २६ | २२.९ |
| अकोला | ३२.८ | २४.९ |
| अमरावती | ३१.४ | २६.२ |
| बीड | ३८.१ | २५ |
| भंडारा | ३४.२ | २५ |
| बुलढाणा | ४०.३ | २९.७ |
| चंद्रपूर | ३७.२ | २५.५ |
| चेन्नई | ४२.६ | ३०.६ |
| नवी दिल्ली | ४१.४ | ३४.३ |
| धुळे | ३०.४ | २५ |
| गोंदिया | ३३.९ | २४.८ |
| जळगाव | २९.९ | २५.२ |
| कोल्हापूर | २६.४ | २२.२ |
| लातूर | ३०.२ | २२.९ |
| मुंबई | ३४.२ | ३०.५ |
| नागपूर | ३४.६ | २४.९ |
| नांदेड | ३४.९ | २४.२ |
| नंदूरबार | २७.१ | २५.१ |
| नाशिक | २४.६ | २३.३ |
| पुणे | २४.६ | २२.७ |
| पंढरपूर | ३३ | २४.५ |
| सातारा | २६.७ | २१.६ |
| सांगली | २७.४ | २२.८ |
| सोलापूर | ३३ | २४.१ |
| वर्धा | ३५.८ | २५.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व बौद्धिक चळवळीचे नेतृत्व आपण कराल. त्यातून आपली प्रतिमा उंचावेल.

**तुळ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व मैत्रिणीसह होणाऱ्या गप्पातून ज्ञानात भर पडेल. काही वैचारिक चर्चा हितकारक ठरतील.

**वृषभ :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम जुन्या आठवणी, नव्या मित्रांची संगत यातून भरीव कामगिरी करू शकाल.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम घरातले मंगल वातावरण, नशीबाची अनुकूल साथ हे सर्व कसे चांगले जमून येणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व घरात कुटुंबियांच्या तब्येती व काही विचित्र प्रश्न यातून सफाईने मार्ग काढावा लागेल.

**धनु :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पूर्व अनाठायी खर्च टाळा. खर्च करताना आपण काही अनिष्ट गोष्टींना खतपाणी घालत नाही ना याची काळजी घ्या.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर आयुष्याला वळण देणारे ठरावेत असे प्रस्ताव आपले उत्पन्नही वाढविणारे ठरतील.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व घरगुती आजारपण, नाराज शेजारी, पाहुण्यांचे मुक्काम आणि स्वत:ची कामाची घाई यातून वेळ काढावा लागेल.


**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व कोणत्याही वादविवादात मध्यस्थी करू नका. शब्दप्रयोग व पैसा यांचा वापर विचारपूर्वक करा.

**कुंभ :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : उत्तर प्रवासातून चांगले अनुभव आपल्या व्यवसायात बदल करायला लावतील. संततीशी वादाचे प्रसंग येतील.

**कन्या :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा : उत्तर घरात काही मंगलकार्ये ठरतील. कार्यक्रमानिमित्त घरात पाहुण्यांची वर्दळ राहील.

**मीन :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : उत्तर नोकरीच्या अपेक्षा असणाऱ्यांना अपेक्षित अशी नोकरी मिळेल. बदल लाभदायक ठरतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०२८



### आडवे शब्द

१. मिठाई तयार करणारा
३. ज्वारीची वाळलेली ताटे, गाय–बैलाचे खाद्य
५. सवाद्य, गाजावाजा करीत
९. सुमारे दोन मैल
११. भांडणे सोडविणारा मध्यस्थ
१३. तंबूवजा घर
१४. रसपूर्ण, रसाळ
१७. लोकनाट्यातील कलाकार
१९. हिंदीत प्रवास
२१. दरवाजा
२२. पाताळ
२४. बोकड
२६. कोवळी फांदी
२७. हिमालय सर करणारा शेर्पा
२८. द्रव्य, किंमत
३०. न्हाव्याची हत्याराची पिशवी, पडशी
३२. युद्धातील वीरश्रींची घोषणा
३५. समुद्राच्या लाटांचा आवाज
३६. गीत गाणे
३७. धातुचा धागा
३८. व्यापारातील नुकसान, फटका, हादरा
३९. मोठी टोपली, फलक
४१. आयुष्य
४३. घर,४५. ढाक्क्याचे प्रसिद्ध कापड
४८. कडक व चिवट
४९. एकाक्षरी प्रश्न
५१. अघळपघळ, स्वैर
५३. हिस्सा
५४. संथपणे
५५. माफी
५६. संतोष, आनंद
५७. प्रतिबिंब दाखविणारी काच
५८. अंगावरील बारीक केस
६०. केस काळे करण्याचे साधन
६१. आवर घालणारी वादी
६२. सैल झालेले (वस्त्र)
६४. आश्चर्याने थक्क होणे
६७. लक्ष्मीपती
६८. सन्मानाची रक्कम
७०. चांदणी
७२. धमनी
७४. गप्प बसणे
७६. इमारतीतील घर, फ्लॅटला मराठी शब्द
७८. हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा स्त्राव
७९. दागदागिने
८०. रड्या मनुष्य

### उभे शब्द

१. सहस्त्रवेळा
२. चणचण
४. लहान मुलांची गाणी
५. भांडणे, चर्चा
६. शोध
७. गालाची बाजू
८. तात्पर्य, अर्थ, सार
१०. सदोदित
१२. आठवाड्याचा दिवस
१५. अखेरीस
१६. विष्णूचा एक अवतार
१८. श्रीमंत
२०. विहीरीतून पाणी काढण्याचे यंत्र
२३. समुद्र
२४. तोंड खाली घातलेला
२५. सततचे नामस्मरण
२९. प्रेम, माया
३१. समीक्षक
३३. सीमा
३४. जयपराजय
३६. कपाळ फुटणे
४०. हिंमत
४२. समुद्रातील अग्नी
४४. निराश
४५. फुलेफळे यांचे शेत
४६. युद्ध
४७. प्रेम, माया, लाड
४८. पुष्कळ
५०. भर दिवसा
५२. जास्तीत जास्त व कमीत कमी
५४. तात्पर्य
५६. अखंडीतपणा
५७. आंब्यातील द्रव
५९. देश, जमीन
६३. फळातील मगज
६५. अवधान, लक्ष
६६. ठेकेदार
६९. टक्कर
७१. फळातील द्रव
७२. होकारच्या विरुद्ध
७३. सहाय्य
७४. मजा, गंमत
७५. मेहरबानी
७७. मेहरबानी
७७. दु:ख, खेद, सल
७८. लुसलुशीत

### जम्बो शब्दकोडे क्र. १०२७ चे उत्तर

आडवे उत्तर १.नवागत ५.कौल ६.पावन ९.मरवा १०.वनचर १२.पवन १३.संगत १४.नास १५.कर १६.लवकर १८.भाक १९.पुलाव २०.सकटनिकट २२.घराणे २३.रमावर २५.रम २६.भाल २७.कसा २९.साल ३१.टप ३३.जर ३४.रमणी ३५.नयन ३६.मरणयातना ३८.रमा ४२.तेज ४३.मजल दरमजल ४६.मोहक ४८.कोदंड ४९.रस ५०.सह ५१.पल ५३.कबाड ५५.गावरान ५६.सड ५७.भेदरट ५९.सोय ६०.दावेदार ६२. मकरंद ६४.करडा ६६.तसनस ६८.डाक ६९.पात ७०.कडा ७२.गुलाब ७४.भाट ७५.मला ७६.राघव राजाराम ८०.भात ८१.अमर ८२.गळ ८३.नभांगण

उभे उत्तर : १.नमनाला घडाभर तेल २.वारस ३.गवा ४.मान ५.कौरव ६.पाव ७.वन ८.संततधार १०.वरवर ११.चलनवलन १२.परकर १३.संकट १५.कला १७.कस १८.भाकड १९.पुणेकर २१.टमटम २४.मासा २६.भारत २८.साम दाम दंड भेद ३०.होन ३२.परवा ३३.जयावह ३७.नाना ३९.माज ४०.काल ४१.आजतागायत ४३अ. जड ४४.दर ४५.रसद ४६.मोहनदास ४७.कप ४८.कोबा ५०.सरा ५२.लहर ५३.कडकडाट ५४.हरकत ५६.सम ५८.डर ६१.दाखला ६३.रंक ६५.डाकघर ६७.नखरा ६९.पाला ७१.डाव ७३.बटण ७४.भाग्य ७५.मत ७६.राम ७७.राग ७८.जाळ ७९.मन

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे




### फिनोलेक्स पाईप्स अँड फिटिंग्जतर्फे पत्रकारांना रेनकोटचे वितरण

**पुणे : दैनिक संध्या**

सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून फिनोलेक्स पाईप्स अँड फिटिंग्जतर्फे पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या सदस्यांना पावसाळ्यात उपयुक्त ठरणाऱ्या दर्जेदार रेनकोटचे वितरण करण्यात आले. यावेळी पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश शेळके, सरचिटणीस हिरा सरवदे, फिनोलेक्स पाईप्स अँड फिटिंग्जचे पदाधिकारी अनिरुद्ध सरनाईक, प्रवीणकुमार सिंह, तुषार गुप्ता व मुकुल माधव फाउंडेशनचे समन्वयक सचिन कुलकर्णी आदी उपस्थित होते. पत्रकारांना कोणत्याही परिस्थितीत घटनास्थळी जाऊन वार्तांकन करावे लागते. विशेषतः पावसाळ्यात प्रतिकूल हवामानाचा सामना करत आपली जबाबदारी पार पाडावी लागते. अशावेळी फिनोलेक्स पाईप्स अँड फिटिंग्जने दिलेले रेनकोट पत्रकारांच्या दैनंदिन कामात उपयुक्त ठरणार असल्याची भावना उमेश शेळके यांनी व्यक्त केली. उद्योग क्षेत्राबरोबरच सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून संस्था विविध उपक्रम राबवत असून, पत्रकारांसाठी केलेला हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकार समाजाच्या चांगल्यासाठी अहोरात्र झटत असतो. ऊन, वारा, पाऊस याची तमा न करता प्रतिकूल परिस्थितीतही आपले कर्तव्य बजावत असतो. पावसाळ्यात त्यांना संरक्षणासाठी रेनकोट उपयोगी पडतील, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. पत्रकार कल्याणासाठी फिनोलेक्स पाईप्स अँड फिटिंग्ज यापुढेही सहकार्य करीत राहील, अशी भावना सरनाईक व कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

### झील जॉब फेअरमध्ये १३४३ विद्यार्थ्यांना नोकरीचे पत्र

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे (प्रतिनिधी) झील एज्युकेशन सोसायटीच्या झील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने , आयोजित केलेल्या ‘झील जॉब फेअर २०२६’ मध्ये तब्बल १३४३ विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांकडून ऑफर लेटर प्राप्त झाली. या रोजगार मेळाव्यात विद्यार्थ्यांनी तब्बल ३५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या भव्य रोजगार मेळाव्यात विविध क्षेत्रांतील ६७ नामांकित राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांनी सहभाग घेतला. यामध्ये बजाज ऑटो, टी.ई. कनेक्टिव्हिटी, कमिन्स, ह्युंदाई मोटर्स, टाटा ऑटोकॉम्प, बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन, जेएफई शोजी स्टील इंडिया प्रा. लि., सन फार्मास्युटिकल इंडस्ट्रीज लि., टॅको एअर इंटरनॅशनल थर्मल सिस्टिम्स प्रा. लि., यशस्वी ग्रुप आदी नामांकित कंपन्यांचा समावेश होता. झील एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. जयेश काटकर म्हणाले कि,“विद्यार्थ्यांना केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे एवढेच आमचे उद्दिष्ट नसून, त्यांना उद्योगविश्वाच्या अपेक्षांनुसार सक्षम बनवून उत्तम रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हीदेखील आमची महत्त्वाची जबाबदारी आहे. झील एज्युकेशन सोसायटीचे संचालक प्रा. उद्धव शिद यांनी सांगितले, “उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्यासाठी अशा रोजगार मेळाव्यांची अत्यंत आवश्यकता आहे. झील सेंट्रल प्लेसमेंट सेलचे डीन डॉ. जितेंद्र खुबानी म्हणाले कि , “झील जॉब फेअर २०२६ चा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना विविध उद्योगांतील रोजगाराच्या अधिकाधिक संधी एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देणे हा होता.

### रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे सोमवारी कवी हनुमंत चांदगुडे यांचा विशेष सन्मान

**पुणे : दैनिक संध्या**

सुमारे २५ वर्षे निसर्ग कविता करणारे शेतकरी कवी हनुमंत चांदगुडे (सुपे, ता. बारामती) यांचा रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी विशेष सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रम सकाळी ११ वाजता सदाशिव पेठेतील अक्षरवेल सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ समीक्षक, कवयित्री डॉ. नीलिमा गुंडी यांच्या हस्ते चांदगुडे यांचा सन्मानपत्र, शाल आणि श्रीफळ देऊन गौरव केला जाणार आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रमोद आडकर यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात पावसावर आधारित ‘मल्हारधून’ हा कवितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यात बंडा जोशी, माधव हुंडेकर, प्रभा सोनवणे, तनुजा चव्हाण, स्वप्नील पोरे, मिना शिंदे, प्रतिभा पवार, विजया गुळवणी, अनुराधा काळे, मृणाल जैन, डॉ. ज्योती रहाळकर, धनंजय तडवळकर यांचा सहभाग असणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

### कृत्रिम बुद्धिमत्तेला मानवी बुद्धिची जोड आवश्यकच : कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी

**पुणे : दैनिक संध्या**

प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इन्टेलिजन्स) उपयुक्त आहे; पण कृत्रिम बुद्धिमत्तेला काही मर्यादाही आहेत. माध्यमांना हे तंत्रज्ञान वृत्त बनवून देईल, पण त्या वृत्तामध्ये नाविन्यता आहे का हे जाणून घ्यावे लागेल. कारण या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संकलित झालेल्या माहितीतूनच एखादे वृत्त मिळू शकते. वृत्तामध्ये नाविन्यता आणण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेबरोबरच मानवी बुद्धिमत्ता वापरणे आवश्यक आहे. असे जर झाले तरच कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग माध्यमांमध्ये चांगल्या प्रकारे होऊ शकेल, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केले. विद्यापीठामध्ये मीडिया इनक्युबेशन सेंटर आणि शंतनुराव किर्लोस्कर अध्यासन सुरू करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संज्ञापन व वृत्तपत्र विद्या विभाग, पुणे श्रमिक पत्रकार संघ, पुणे पत्रकार प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या सहयोगाने पुणे मॅनेजमेंट असोसिएशन (पीएमए)च्या सेंटर ऑफ एक्सलन्स (मिडीया अँड एन्टरटेन्मेंट) तर्फे मंगळवारी (दि. २८) पत्रकारिता, माध्यम उद्यमता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. पुणे पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष शैलेश काळे, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश शेळके, पुणे मॅनेजमेंट असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रदीप तुपे, संज्ञापन व वृत्तपत्र विद्या विभागाचे प्रमुख डॉ. संजय तांबट, प्रसाद मिरासदार, ज्येष्ठ लेखक व अभ्यासक डॉ. अच्युत गोडबोले मंचावर होते. डॉ. सुरेश गोसावी पुढे म्हणाले, माध्यम प्रतिनिधीने एखाद्या व्यक्तीला बोलते करणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून बोलते करणे यात खूप फरक आहे. एआय उपकरण तुम्हाला बोलते करू शकेल का हा प्रश्न आहे. पुणे मॅनेजमेंट असोसिएशनच्या उपक्रमांची माहिती देऊन प्रसाद मिरासदार यांनी रानडे इन्स्टिट्यूटमध्ये मीडिया इनक्युबेशन सेंटर सुरू करावे.

# बी. जे. महाविद्यालयातील विद्यार्थी १४ दिवसांपासून बेपत्ता

## सोबतच्या विद्यार्थ्यांकडून मानसिक छळ झाल्याचा पालकांचा आरोप

■ पुणे (दै. संध्या)

बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस प्रथम वर्षाचा विद्यार्थी तन्मय अजकुमार वंगे (वय २०) हा गेल्या १४ दिवसांपासून बेपत्ता असून, त्याच्या बेपत्ता होण्यामागे त्याच्या सोबत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडून झालेल्या मानसिक छळाचा आणि रॅगिंगचा संबंध असल्याचा गंभीर आरोप त्याच्या पालकांनी केला आहे. या तक्रारीनंतर महाविद्यालय प्रशासनाने स्वतंत्र चौकशी सुरू केली असून, आता अँटी-रॅगिंग समितीमार्फतही सखोल तपास केला जाणार आहे.

कोल्हापूर येथील मूळचा असलेला तन्मय बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत असून महाविद्यालयाच्या मुलांच्या वसतिगृहात राहत होता. १८ जुलै रोजी तो खराडी येथे राहणाऱ्या गावाकडील मित्राला भेटण्यासाठी गेला होता. तेथून हडपसर येथे राहणाऱ्या काकांकडे जात असल्याचे सांगून तो निघाला. त्यानंतर त्याचा कोणताही संपर्क झालेला नाही. त्याचा मोबाइलही १८ जुलैपासून बंद असून, २० जुलै रोजी वडील अजकुमार व्यंकटराव वंगे यांनी खराडी पोलिस ठाण्यात तन्मय हरवल्याची तक्रार दाखल केली आहे. तन्मयचा अद्याप शोध लागलेला नसल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली आहे. दरम्यान, आई विजयालक्ष्मी वंगे आणि वडील अजकुमार वंगे यांनी २७ जुलै रोजी बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांच्याकडे लेखी तक्रार देत तन्मयला काही सोबतच्या विद्यार्थ्यांकडून सातत्याने मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप केला आहे.




तक्रारीनुसार, तन्मयला वारंवार अपमानास्पद वागणूक देणे, चिडवणे, टोमणे मारणे असे प्रकार होत होते. ही माहिती तन्मयने स्वतः तसेच त्याचे शालेय मित्र आणि नातेवाईक यांच्याकडे व्यक्त केल्याचे पालकांनी नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर वसतिगृहातील सीसीटीव्ही फुटेज तपासून संबंधित विद्यार्थ्यांची सखोल चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.या तक्रारीची गंभीर दखल घेत महाविद्यालय प्रशासनाने तक्रार निवारण समितीमार्फत स्वतंत्र चौकशी समिती स्थापन केली. संबंधित विद्यार्थी, अधिकारी आणि उपलब्ध माहितीच्या आधारे समितीने चौकशी केली असून, तिचा अहवाल अंतिम टप्प्यात असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.दरम्यान, ३० जुलै रोजी तन्मयच्या पालकांनी अधिष्ठातांकडे पुन्हा अर्ज करून चौकशीला गती देण्याची मागणी केली. त्यानंतर रॅगिंगचा आरोपही स्वतंत्रपणे तपासण्याचा निर्णय घेण्यात आला असून, अँटी-रॅगिंग समितीमार्फत या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाणार आहे. तन्मयच्या बेपत्ता होण्यामागे रॅगिंगचा काही संबंध आहे का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. पोलिस तपासासोबतच महाविद्यालयीन समितीचा अहवालही या प्रकरणातील पुढील दिशा ठरविण्यास महत्त्वाचा ठरणार आहे. पोलिस तपासादरम्यान तन्मय रेल्वे स्थानकावरून सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वेत चढल्याचे सीसीटीव्ही चित्रणावरून समोर आले आहे. पुढे तो कोणत्या स्थानकावर उतरला याबाबत अद्याप माहिती मिळू शकली नाही. त्याचा दूरध्वनी बंद असला तरी त्याच्या सोशल मीडिया अकाऊंटची सखोल तपासणी करण्यात येत असून, त्याचा पथकाकडून शोध घेण्यात येत असल्याचे खराडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय चव्हाण यांनी सांगितले. एमबीबीएस प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याच्या पालकांनी २७ जुलै रोजी मानसिक छळाबाबत तक्रार केली होती. त्यानुसार तातडीने चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून, समितीचा अहवाल अंतिम टप्प्यात आहे. त्यानंतर रॅगिंग झाल्याची तक्रारही प्राप्त झाली आहे. त्यामुळे अँटी-रॅगिंग समितीची बैठक बोलावण्यात आली असून, या आरोपांचीही स्वतंत्र व सखोल चौकशी करण्यात येणार आहे.

## पुण्यात काँग्रेसचे आंदोलन

■ पुणे (दै. संध्या)

पुणे : लोकमान्य टिळक पुरस्काराच्या निमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे शनिवारी (दि. १) पुणे दौऱ्यावर असताना नवी दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याचा निषेध करण्यासाठी काँग्रेस पक्षाकडून मार्केटयार्डजवळील हॉटेल उत्सव येथे आंदोलन करण्यात येत आहे. तर काँग्रेसच्याआंदोलनाला जशास तसे उत्तर देण्यासाठी भाजपने काँग्रेस भवन येथे आंदोलन केले आहे. पुण्यात दोन्ही पक्ष एकमेकांच्या विरोधात आंदोलन करत असल्याचे दिसून आले आहे.

दरम्यान पोलिसांनी पोलिसांकडून भाजप कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांना आंदोलनाला परवानगी देण्यात आली नव्हती. तरीही भाजपचे कार्यकर्ते काँग्रेस भवनाजवळ जमा झाले. व त्यांनी आंदोलनाला सुरुवात केली. मात्र त्याठिकाणी पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे. तर दुसरीकडे नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरण आणि आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराचा निषेध करण्यासाठी काँग्रेसकडून केंद्रीय गृहमंत्री म्हणून अमित शाह यांच्या विरोधात शहराध्यक्ष प्रशांत जगताप, दीप्ती चौधरी आणि माजी आमदार मोहन जोशी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरु आहे. पोलिसांनी आंदोलन करण्यासाठी मार्केटयार्डजवळील हॉटेल उत्सव येथे परवानगी दिली आहे.

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (लोकमान्य टिळक स्वराज्य संघ) वतीने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार दिला जाणार आहे. हा कार्यक्रम मुकुंदनगर येथील कटारिया हायस्कूलच्या मैदानावर होणार आहे. तसेच अमित शाह सारसबाग येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यासाठी जाणार आहेत.

## स्मार्ट मीटर सक्तीने बदलण्याचा शासन निर्णय कुठे आहे? रवींद्र धंगेकर आणि प्रशांत जगतापांचा महावितरणला सवाल

■ पुणे (दै. संध्या)

शहरात वीज ग्राहकांचे जुने मीटर काढून त्या ठिकाणी नवीन स्मार्ट मीटर बसवण्याच्या विरोधात माजी आमदार रवींद्र धंगेकर व काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आक्रमक भूमिका घेत शुक्रवारी (दि.३१) रास्ता पेठ येथील महावितरण कार्यालयात भेट देऊन अधिकाऱ्यांना याबाबत विचारणा केली. त्यांनी पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांना थेट जाब विचारत, स्मार्ट मीटर बसवणे सक्तीचे आहे, असा शासन निर्णय कुठे आहे? तो आधी दाखवा, अशी मागणी केली. शासन निर्णय नसेल, तर महावितरण ज्या पद्धतीने मीटर बसवत आहे ती पद्धत अत्यंत चुकीची आणि बेकायदेशीर आहे, असा हल्लाबोल त्यांनी केला.

धंगेकर म्हणाले, मीटर बसवण्यासाठी पूर्वपरवानगी घेतली जात नाही. कंत्राटदारांचे कर्मचारी थेट येतात आणि आपण महावितरणचेच लोक आहोत, असे सांगून लोकांची फसवणूक करतात. अनेक ठिकाणी गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकांचा वापर करून चोरीछुप्या पद्धतीने हे मीटर बसवले जात आहेत. मीटर बदलताना महावितरणचा अधिकारी त्या ठिकाणी उपस्थित नसतो. जुना मीटर चांगल्या स्थितीत असेल, तर नागरिकांना तोच मीटर वापरण्याचा अधिकार आहे की नाही? असा सवाल करत त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. जगताप यांनी महावितरणला इशारा देत म्हटले, पुण्यातील जनता अजूनही संयम बाळगून आहे. मात्र, महावितरणने ही बेकायदेशीर सक्ती अशीच चालू ठेवल्यास लोकांच्या तीव्र उद्रेकाला वेळ लागणार नाही. जर शासनाचा असा कोणताही आदेश नसेल, तर आम्ही शासनाला क्लीन चीट देऊ आणि महावितरणच ही सक्ती करत आहे, असा निष्कर्ष काढू. उपस्थित नागरिकांनीही महावितरणच्या अधिकाऱ्यांसमोर आपला संताप व्यक्त केला. हे स्मार्ट मीटर बसवले आहेत, ते कसे काढायचे आणि पूर्ववत जुने मीटर कसे लावायचे? असा सवाल नागरिकांनी केला. महावितरणकडून यावर स्पष्ट आणि समाधानकारक उत्तर न मिळाल्याने स्मार्ट मीटरच्या या सक्तीविरोधात पुण्यातील आंदोलन अधिक तीव्र करणार असल्याचे सांगितले. पुणेकरांनी महावितरण किंवा कंत्राटदारांचे लोक तुमच्या घरी स्मार्ट मीटर लावायला आल्यास त्यांना पहिल्यांदा महावितरणचा किंवा शासनाचा अधिकृत आदेश मागा. जोपर्यंत अधिकारी प्रत्यक्ष शासन निर्णय दाखवत नाहीत, तोपर्यंत एकाही नागरिकाने आपल्या घरातील जुना मीटर बदलू देऊ नये आणि नवीन स्मार्ट मीटर लावू देऊ नये. कुठेही सक्ती झाल्यास माझ्याशी संपर्क करावा.

## एथर एनर्जीने पॉटहोल+ अलर्ट्स सादर केले, कनेक्टेड फ्लीट इंटेलिजन्सवर आधारित

■ पुणे (दै. संध्या)

एथर एनर्जीने जेन 2 आणि त्यापुढील स्कूटर्ससाठी ‘पॉटहोल+ अलर्ट्स’ सुरू केले आहेत, ज्यामध्ये एथर 450 एपेक्स, 450X आणि रिझ्टा Z यांचा समावेश आहे. या फीचरद्वारे एथरच्या कनेक्टेड स्कूटर फ्लीटमधून मिळणाऱ्या डेटाचा वापर करून रायडर्सना पुढील खड्डे, तुटलेले रस्ते, असमान पृष्ठभाग आणि स्पीड ब्रेकर याबद्दल सूचना दिली जाते. इतकेच नव्हे तर, रायड सुरू होण्यापूर्वी केवळ सर्वात जलद मार्गच नव्हे तर सर्वात गुळगुळीत मार्ग सुचवण्याचे अतिरिक्त पाऊलही हे फीचर उचलते.

X वर घोषणा करताना, एथरचे सहसंस्थापक आणि CEO तरुण मेहता यांनी सांगितले की हे फीचर जवळपास नऊ वर्षांच्या प्रयत्नांनंतर साकार झाले आहे. “आव्हान कधीच कल्पनेचे नव्हते, ते डेटाचे होते,” असे मेहता यांनी लिहिले. त्यांनी स्पष्ट केले की हे फीचर तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कनेक्टेड फ्लीटची गरज होती, जी कालांतराने त्याच रस्त्यांवर प्रवास करत राहील. यामुळे एथरला रस्त्यांची अचूक स्थिती ओळखण्यासाठी आवश्यक असलेली फ्लीट इंटेलिजन्स निर्माण करता आली. प्रत्येक एथर स्कूटरमध्ये ऑनबोर्ड कॉम्प्युट आणि कनेक्टिव्हिटीची सुविधा दिली आहे, ज्यामुळे कंपनीला सतत वास्तवातील रायडिंग डेटा गोळा करता येतो आणि ओव्हर-द-एअर सॉफ्टवेअर अपडेट्सद्वारे नवनवीन क्षमता पुरवता येतात. मेहता यांच्या मते, ‘पॉटहोल+ अलर्ट्स’ हे या कनेक्टेड इकोसिस्टमचे पहिले मोठ्या प्रमाणावरचे अनुप्रयोगांपैकी एक आहे, जे लाखो किलोमीटरच्या रायड डेटा चे रूपांतर करून दररोज रायडर्सना फायदेशीर ठरणारे फीचर बनवते. स्कूटरच्या नेव्हिगेशन अनुभवात समाविष्ट असलेले ‘पॉटहोल+ अलर्ट्स’ रायडर्सना खड्डे, तुटलेले रस्ते, असमान पृष्ठभाग आणि स्पीड ब्रेकर याबाबत आगाऊ सूचना देतात. हे अलर्ट्स स्कूटरच्या डॅशबोर्डवर दिसतात तसेच स्कूटरच्या स्पीकर्स, एथर हेलो स्मार्ट हेल्मेट किंवा कोणत्याही सुसंगत ब्लूटूथ हेडसेटद्वारेही दिले जाऊ शकतात. या रोलआउटमधून एथरचा वास्तवातील रायडिंग डेटावर आधारित कनेक्टेड फीचर्स विकसित करण्यावर असलेला सातत्यपूर्ण भर दिसून येतो.

मेहता यांनी पुढे सांगितले की ‘पॉटहोल+ अलर्ट्स’ ही केवळ सुरुवात आहे, कारण कंपनी आपल्या वाढत्या रोड इंटेलिजन्स डेटासेटवर आधारित आणखी रायडर अनुभव तयार करण्याची योजना आखत आहे.

## सोनी सबचे कलाकार फ्रेंडशिप डे साजरा

■ पुणे (दै. संध्या)

मैत्री ही आयुष्यातील सर्वात मोठ्या आशीर्वादांपैकी एक आहे, जी प्रत्येक टप्प्यावर न थांबणारा आधार, प्रोत्साहन आणि सोबत देते. यश साजरे करण्यापासून ते कठीण प्रसंगात एकमेकांच्या पाठीशी उभं राहण्यापर्यंत, खरी मैत्री हीच सर्वात मोठी ताकद आणि प्रेरणेचा स्रोत ठरते. फ्रेंडशिप डेच्या निमित्ताने सोनी सबचे कलाकार इक्बाल खान, मनीष वधवा, मुस्कान बामने, गुलकी जोशी आणि चंदन आनंद यांनी त्यांच्या आयुष्याच्या सुरुवातीपासून त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या आणि प्रत्येक प्रवासात सोबत राहिलेल्या मित्रांबद्दल हृदयस्पर्शी कथा शेअर केल्या आहेत.

बालपणीचे सोबती, कॉलेजमधील मित्र किंवा स्वप्नांचा पाठलाग करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणारे लोक कलाकार त्या मैत्रीवर विचार करतात जी आजही त्यांच्या आयुष्याला आकार देत आहे आणि मजबूत आधारव्यवस्थेचं महत्त्व त्यांना सतत जाणवून देते. इक्बाल खान, जो यादें मध्ये डॉ. देव मेहता यांची भूमिका साकारतो, यांनी सांगितले, “मी अजूनही माझ्या शाळा आणि कॉलेजमधील सगळ्या मित्रांशी संपर्कात आहे आणि मला सर्वात जास्त आश्चर्य वाटतं ते म्हणजे त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला होता की मी अभिनेता बनेन, अगदी मी स्वतःवर विश्वास ठेवण्याआधीच. त्यांनी माझ्यात काहीतरी पाहिलं होतं जे त्या वेळी मला दिसलं नव्हतं आणि त्यांच्या त्या विश्वासामुळे मला माझं स्वप्न पूर्ण करण्यासाठी आत्मविश्वास मिळाला, अगदी स्वतःवर शंका घेतलेल्या क्षणांतही. आयुष्याने आम्हाला कुठेही नेलं असलं तरी त्यांनी माझ्या प्रवासातील प्रत्येक टप्पा स्वतःचा असल्यासारखा साजरा केला आहे.

## ही पौर्णिमा स्वरांची'मध्ये अजरामर गीतांनी जागविल्या सांगीतिक स्मृती

■ पुणे (दै. संध्या)

काही गीते काळाच्या प्रवाहातही जुनी होत नाहीत; प्रत्येक सादरीकरणातून ती नव्याने अनुभवता येतात. स्वरांच्या सुमधुर मैफिलीतून अशाच अजरामर गीतांचा सुवर्णकाळ 'ही पौर्णिमा स्वरांची' या कार्यक्रमात पुन्हा एकदा रसिकांसमोर उभा राहिला. गणेश वंदनेपासून जयोस्तुते श्री महान मंगलेपर्यंतच्या एकापेक्षा एक सरस सादरीकरणातून रसिकांच्या सांगीतिक स्मृतींना उजाळा यावेळी मिळाला.

हिंदू महासभा आयोजित आणि स्वच्छंद पुणे प्रस्तुत या कार्यक्रमात हिंदू महासभेचे अध्यक्ष आनंद दवे, चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले , किशोर भक्त गायक मकरंद पाटणकर, विद्या घटवाई यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात 'वंदितो तुजला गजवदना' या गणेश वंदनेने झाली. त्यानंतर प्रभाकर जोग यांनी संगीतबद्ध केलेले 'गुरूने दिला ज्ञानरूपी वसा... आम्ही चालवू हा पुढे वारसा'... हे गुरुची महती सांगणारे गीत सादर करून गुरूंना स्वरांजली अर्पण करण्यात आली. गुरुमहिमा सांगणाऱ्या गीतांनंतर वीररसाने ओतप्रोत भरलेले 'हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी' हे गीत रवींद्र शाळू आणि पल्लवी आनदेव यांनी प्रभावी शैलीत सादर केले. त्यानंतर एस. डी. बर्मन यांनी संगीतबद्ध केलेले अभिमान चित्रपटातील 'अब तो है तुमसे हर खुशी अपनी' हे गीत प्रीती पेठकर यांनी सादर केले. अंजाना चित्रपटातील



'रिमझिम के गीत सावन गाए' हे युगुलगीत प्रीती पेठकर आणि संजय कांबळे यांनी सादर करताच रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत 'वन्स मोअर'ची मागणी केली. आनंद चित्रपटातील 'ना जिया लागे ना... तेरे बिना मेरा कहीं जिया लागे ना' हे गीत पल्लवी आनदेव यांनी भावपूर्ण शैलीत सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर 'चंद्र आहे साक्षीला' आणि 'रिमझिम गिरे सावन' या गीतांनी पावसाळ्याच्या सरींची अनुभूती देत रसिकांना जुन्या आठवणींच्या विश्वात नेले. 'कानडा राजा पंढरीचा', 'शुक्रतारा', 'शारद सुंदर', 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे', 'गुलाबी आँखे' आणि 'वादा कर ले साजना' या लोकप्रिय गीतांनी कार्यक्रमाची रंगत आणखी वाढवली. कार्यक्रमात गायक रवींद्र शाळू, पल्लवी आनदेव, प्रीती पेठकर, संजय कांबळे यांच्यासह मकरंद पाटणकर यांनी सादरीकरण केले. तसेच अवघ्या दीड वर्षांच्या वयापासून महाराष्ट्रातील विविध किल्ले सर करणाऱ्या बालगिर्यारोहक राजवर्धिनी चव्हाण हिचा विशेष सत्कार कार्यक्रमात करण्यात आला. शैलेश देशपांडे (सॅक्सोफोन व बासरी), असिफ इनामदार (ऑक्टोपॅड), रोहित जाधव (तबला-ढोलकी), नितीन कुलकर्णी (गिटार) यांनी सुरेल साथसंगत केली.

# राज्यात पावसाचा जोर कायम

## नंदुरबारमध्ये शाळा- महाविद्यालयांना सुट्टी, मुंबई- ठाणेकरांसाठी ३ तास महत्त्वाचे



राज्यात पावसाचा जोर कायम असून नंदुरबार जिल्ह्यात रेड अलर्ट जारी करण्यात आला असून मुंबई, ठाणे आणि रायगडसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून अनेक जिल्ह्यांमधील जनजीवन विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने नंदुरबार जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केल्यानंतर प्रशासनाने शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली. तर, मुंबई, ठाणे आणि रायगडसाठी तीन तासांचा यलो अलर्ट जारी केला नद्या आणि धरणांमधील पाण्याचा साठा झपाट्याने वाढल्याने प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले आहे. तसेच नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नंदुरबार जिल्ह्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा देत हवामान विभागाने 'रेड अलर्ट' जारी केला आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा विचार करता जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाड्यांना एका दिवसाची सुट्टी जाहीर केली. तर, मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांसाठी तीन तासांचा 'येलो नाऊकास्ट अलर्ट' जारी केला आहे. या काळात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने आवश्यकता नसल्यास नागिरकांनी घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन केले आहे.

पुणे जिल्ह्यात यंदा पावसाने जुने सर्व विक्रम मोडले आहेत. ३१ जुलैपर्यंत जिल्ह्यात सरासरीच्या तब्बल १७९.९ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

जिथे सरासरी ३०९.३ मिमी पाऊस पडणे अपेक्षित होते, तिथे तब्बल ५५६.३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मावळ तालुक्यात सर्वाधिक १६८०.३ मिमी पाऊस झाला आहे, तर खेड तालुक्यात सरासरीच्या तुलनेत सर्वाधिक म्हणजे ३९०.९ टक्के पाऊस झाला आहे.


### मेडीगट्टा लक्ष्मी धरणाचे सर्व ८५ दरवाजे उघडले

गडचिरोली जिल्ह्यातील सर्वात मोठ्या मेडीगट्टा लक्ष्मी धरणातून सध्या सुमारे ९.७१ लाख क्यूसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. पाण्याचा प्रचंड प्रवाह लक्षात घेता धरणाचे सर्व ८५ दरवाजे उघडण्यात आले आहेत. यामुळे प्राणहिता आणि गोदावरी नद्यांमध्ये पुराची स्थिती निर्माण झाली असून सखल भागांत धोका वाढला आहे. नदीकाठच्या रहिवाशांना सुरक्षित स्थळी जाण्याच्या व सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उजनी धरणातून ८० हजार क्यूसेक आणि वीर धरणातून ४३ हजार क्यूसेक पाणी सोडण्यात आल्याने भीमा आणि चंद्रभागा नद्यांच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. पंढरपूर येथील पुंडलिक मंदिरासह अनेक लहान-मोठी मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. तसेच भीमा नदीवरील कोल्हापूर पद्धतीचे आठ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने सर्व घाटांवर भाविकांना स्नानासाठी जाण्यास सक्त मनाई केली आहे.

### जालन्यात पावसाची दमदार हजेरी

जालना जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या पावसामुळे ५० पैकी ३९ महसूल मंडळांमध्ये ६५ मिमीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात गेल्या २४ तासांत सरासरी ८३ मिमी पाऊस झाला असून भोकरदन तालुक्यात सर्वाधिक पाऊस झाला. बदनापूर आणि मंठा तालुक्यात तीन घरांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील नदी-नाले प्रवाहीत झाले असून सुकणाऱ्या पिकांना नवसंजीवनी मिळाल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

## केळघर घाट वाहतुकीसाठी बंद



■ सातारा (दै. संध्या)

जिल्ह्याच्या पश्चिम भागातील तापोळा, महाबळेश्वर, कोयना, नवजासह कांदाटी खोऱ्यात पाऊस सुरूच असल्याने मोठी धरणे भरू लागली आहेत. यामुळे पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी प्रमुख सहा धरणांतून विसर्ग सुरू झाला आहे. कोयना धरणातही ८२ टीएमसी साठा झाल्याने बुधवारी सकाळपासून पायथा वीजगृहातून पाणी सोडण्यास सुरूवात झाली. त्यामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. तर सतत पाऊस सुरू असल्याने दरडी कोसळण्याच्या शक्यतेने सातारा - महाबळेश्वर मार्गावरील केळघर घाटातून वाहतूक बंद करण्यात आलेली आहे.

पावसाळ्याचे दोन महिने संपत आले आहेत. आतापर्यंत मोठ्या प्रमाणात पाऊस झाला नसला तरी समाधानकारक स्थिती आहे. पश्चिम भागातच पावसाचा जोर राहिला आहे. त्या तुलनेत पूर्व दुष्काळी भागात पावसाने दडी कायम ठेवली आहे. यामुळे खरीप हंगामातील पेरणीवर परिणाम झाला. तसेच पाण्याअभावी पिके कोमेजत आहेत. तसेच अनेक गावांना आजही टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. पश्चिम भागात पावसाचा जोर राहिला.

पाटण, जावळी, वाई, सातारा आणि महाबळेश्वर तालुक्यात दमदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांना फायदा झाला. त्याचबरोबर कोयना, धोम, बलकवडी, कण्हेर, तारळी आणि उरमोडी हे सहा मोठे प्रकल्पही भरण्याच्या स्थितीत आहेत. पाऊस सुरू असल्याने सर्व सहा प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरू झाला. सातारा शहरात बुधवारी पावसाची उघडझाप सुरू होती. तर पश्चिम भागात चांगला पाऊस पडला. बुधवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांत नवजा येथे १००, तर कोयनानगरला ८८ मिलिमीटर पाऊस झाला.

## भर पावसात फलटणमध्ये पाणीटंचाई

■ आदर्की (दै. संध्या)

फलटण तालुक्याच्या पश्चिम भागात गेल्या काही वर्षांत जलस्वराज पाणीपुरवठा योजना, टंचाई निवारण योजना, मागासवर्गीय वस्ती पाणीपुरवठा योजना, सासवड पाणीपुरवठा योजना, जलजीवन मिशन तसेच धोम-बलकवडी प्रकल्पाच्या कालव्यांतर्गत विविध पाणीपुरवठा योजनांसाठी कोट्यवधींचा निधी खर्च करण्यात आला; परंतु यावर्षी पर्जन्यमान कमी राहिल्याने पाणीसाठा खालवला. त्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाली. जुलै संपला तरी पाऊस पडला नसल्याने गावोगावी पाण्याचे टँकर सुरू केले आहेत.



फलटण पश्चिम तालुक्यात विविध पाणीपुरवठा योजनांमधून पाइपलाइन टाकणे, विहिरींची खोदाई, जलस्रोतांची निर्मिती आणि वितरण व्यवस्था उभारण्याची कामे करण्यात आली. मात्र, यंदाच्या अत्यल्प पर्जन्यमानामुळे या योजनांवर पुन्हा एकदा पाणीटंचाईचे संकट ओढवले असून, अनेक गावांतील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

यावर्षी मान्सूनने अपेक्षित साथ दिली नसल्याने जुलै महिना संपत आला तरी तालुक्याच्या पश्चिम भागात मोठा पाऊस झालेला नाही.

परिणामी विहिरी, बोअरवेल, ओढे आणि अन्य जलस्रोतांची पाणीपातळी खालावली आहे. अनेक गावांतील नियमित पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून, ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित ग्रामपंचायतींनी सुमारे महिनाभरापूर्वी प्रशासनाकडे पाणीटंचाईचे प्रस्ताव सादर केले होते.

## वेण्णा, कृष्णाच्या पोटात विषाचा गोळा!;

■ सातारा (दै. संध्या)

सातारा नगरपालिकेचा प्रवास आज डिजिटल काळात पोहोचला; पण सांडपाण्याच्या एका थेंबावरही प्रक्रिया करण्याची क्षमता पालिकेला निर्माण करता आलेली नाही. सातारकरांच्या दैनंदिन पाणी वापरातून निर्माण होणारे तब्बल ८० टक्के सांडपाणी दररोज शुद्धीकरणाविना थेट वेण्णा नदीच्या पोटात पोहोचते. वेण्णा आणि कृष्णा नदीकाठच्या इतर गावांचे दूषित पाणीही याच पात्रात मिसळत असल्याने, कधीकाळच्या या पवित्र नद्या आता विषारी पाण्याचे आगार बनल्या आहेत. केवळ जलप्रदूषणच नव्हे, तर या नद्यांची नैसर्गिक जैवविविधताही आता धोक्यात आली आहे. साताऱ्याचे जलप्रदूषण केवळ वेण्णा नदीपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते पाण्याच्या रूपात पुन्हा एकदा सातारकरांच्या घरापर्यंत पोहोचले आहे. संगममाहुली येथे वेण्णा आणि कृष्णा या दोन नद्यांचा संगम होतो. वेण्णेतून वाहून येणारे सांडपाणी याच संगमावर कृष्णेच्या पात्रात विलीन होते. धक्कादायक बाब म्हणजे, संगममाहुली येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची 'कृष्णा उद्भव' योजना कार्यरत असून, तेथून पाणी उचलून शहराच्या पूर्व भागाला पिण्यासाठी पुरविले जाते. जरी हे पाणी प्रक्रियेनंतर पुरविले जात असले, तरी नद्यांच्या संगमावरच सांडपाण्याचा मोठा प्रवाह मिसळत असताना असे पाणी पिणे कितपत सुरक्षित आहे, हा प्रश्न विचार करायला भाग पाडतो. या दूषित पाण्याचा थेट मारा स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर आणि शेतीवर होत आहे. संगममाहुली, खेड, सदरबझार, लक्ष्मीटेकडी आणि वर्ये परिसरात त्वचारोगांचे प्रमाण अधिक आहे. तर दुसरीकडे, वेण्णा नदीच्या पाण्यावर फुलणारी ३५ ते ४० हजार हेक्टरवरील शेती आता संकटात सापडली आहे. पन्नास ते साठ टक्के शेतकरी नदीच्या पाण्यावरच भाजीपाला पिकवतात. सातारा शहराची लोकसंख्या १ लाख ८० हजार इतकी आहे. यापैकी सुमारे ७० हजार नागरिकांना नगरपालिका पाणी देते. तर शहराचा पूर्व भाग व परिसरातील वाड्या-वस्त्यांना जीवन प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा केला जातो. पालिकेकडून प्रतिमाणसी १३५ लिटर तर प्रति कुटुंब ५०० लिटर या हिशोबाने दररोज पाणी दिले जाते. शहरात नगरपालिकेच्या दोन योजना कार्यान्वित असून, यापैकी कास योजनेतून ५.५० तर शहापूर योजनेतून ७.५० असे एकूण १३ एमएलडी पाणी रोज शहराला पुरविले जाते.

## थोडक्यात पण महत्वाचे

### व्यावसायिक एलपीजी सिलेंडर २०९ रुपयांनी झाला स्वस्त

**मडगाव : दैनिक संध्या**

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्याच दिवशी सर्वसामान्यांसाठी आणि व्यवसायिकांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. देशातील तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोग्रॅमच्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या दरात मोठी कपात केली आहे. नवीन दर १ ऑगस्ट २०२६ पासून लागू करण्यात आले आहेत. या कपातीमुळे व्यावसायिक गॅस सिलेंडर तब्बल २०९ रुपयांपर्यंत स्वस्त झाला आहे. मात्र, १४.२ किलोग्रॅमच्या घरगुती स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही; त्यांचे दर ७ जूनचेच कायम ठेवण्यात आले आहेत. जुलै महिन्यात १८३ रुपयांची कपात केल्यानंतर, ऑगस्टच्या सुरुवातीलाच तेल कंपन्यांनी पुन्हा एकदा दरकपात करून हॉटेल, रेस्टॉरंट आणि व्यवसायिकांना मोठा दिलासा दिला आहे. गेल्या दोन महिन्यांत दिल्लीत व्यावसायिक सिलेंडर तब्बल ३८५.५० रुपयांनी स्वस्त झाला आहे. प्रमुख शहरांतील १९ किलो व्यावसायिक सिलेंडरचे नवे दर: दिल्ली: रु. १९२ ची कपात - नवी किंमत: रु. २,७३८ (आधी रु. २,९३०) कोलकाता: रु. २०९ ची कपात - नवी किंमत: रु. २,८७२.५० पटना: रु. २०९ ची कपात -नवी किंमत: रु. ३,०१८ (आधी रु. ३,२२७) चालू वर्ष २०२६ च्या सुरुवातीपासूनच व्यावसायिक गॅसच्या किमतींमध्ये सातत्याने वाढ होत होती. आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर मार्च ते मे दरम्यान या सिलेंडरचे दर विक्रमी पातळीवर पोहोचले होते. मे महिन्यात एकाच वेळी ९९३ रुपयांची प्रचंड वाढ होऊन दिल्लीत दर ३,०७१.५० रुपयांवर गेले होते. मात्र, जुलै आणि ऑगस्ट महिन्यांतील सलग कपातीमुळे आता व्यावसायिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. एकीकडे व्यावसायिक गॅस स्वस्त होत असताना, सामान्य गृहिणींच्या बजेटवर मात्र कोणताही सकारात्मक परिणाम झालेला नाही. १४.२ किलोग्रॅमच्या घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात कोणतीही कपात केलेली नाही.

### कठोर कायदा लागू; परीक्षा सुधारणा विधेयकावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी

**नवी दिल्ली : दैनिक संध्या**

देशातील सार्वजनिक परीक्षांमध्ये होणारी पेपरफुटी आणि इतर गैरप्रकार रोखण्यासाठी केंद्र सरकारने आणलेल्या 'पब्लिक एक्झामिनेशन्स (प्रिव्हेन्शन ऑफ अनफेअर मीन्स) दुरुस्ती विधेयक २०२६ ला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे हा कायदा आता अधिकृतपणे लागू झाला आहे. या दुरुस्तीमुळे परीक्षा गैरप्रकरणांच्या तपास आणि खटल्यांची प्रक्रिया अधिक वेगवान करण्यात आली आहे. राज्य सरकारांनाही अशा प्रकरणांच्या तपासासाठी अधिक अधिकार देण्यात आले असून विशेष फास्ट ट्रॅक न्यायालयांमार्फत खटल्यांचा निश्चित कालावधीत निकाल लावण्याची तरतूद करण्यात आली आहे. पेपरफुटी किंवा परीक्षा गैरप्रकारांत सहभागी असलेल्या संस्था, सेवा पुरवठादार आणि संघटित रॅकेटविरोधात अधिक कठोर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. दोषी सेवा पुरवठादारांना सार्वजनिक परीक्षा प्रक्रियेतून आठ वर्षांसाठी अपात्र ठरवण्याची तरतूदही या कायद्यात करण्यात आली आहे. या कायद्यामुळे सार्वजनिक परीक्षांची पारदर्शकता, विश्वासार्हता आणि निष्पक्षता अधिक बळकट होईल तसेच लाखो विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण होईल असा केंद्र सरकारचा विश्वास आहे. नवीन सुधारणा कायदा स्पर्धा परीक्षांमध्ये गैरप्रकार करणाऱ्या टोळ्या, कोचिंग संस्था आणि सेवा पुरवठादारांवर कठोर कारवाई करेल. गैरमार्गांचा वापर करणाऱ्यांना कडक शिक्षा आणि मोठा दंड आकारण्यात आला आहे. हा कायदा केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC), कर्मचारी निवड आयोग (SSC), रेल्वे भरती मंडळ (RRB), राष्ट्रीय चाचणी संस्था (NTA) आणि इतर केंद्र सरकारच्या मंत्रालये व विभागांद्वारे आयोजित सर्व परीक्षांना लागू होतो. गेल्या काही वर्षांत नीट (NEET) परीक्षेसह विविध भरती परीक्षांमधील प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे उमेदवारांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागले आहे. हा नवीन कायदा केवळ उमेदवारांचा आत्मविश्वास वाढवणार नाही तर परीक्षांचे निष्पक्ष आणि वेळेवर आयोजन देखील सुनिश्चित करेल.

### अंदाधुंद गोळीबारात २ कामगारांचा मृत्यू, सुरक्षा जवानांचं सर्च ऑपरेशन

**श्रीनगर : दैनिक संध्या**

जम्मू काश्मीरमध्ये दहशतवाद्यांविरोधात सुरक्षा जवानांचे सर्च ऑपरेशन सुरू आहे. कुलगामच्या केल्लाम परिसरात शुक्रवारी रात्री झालेल्या दहशतवादी हल्ल्याने परिसरात दहशत पसरली आहे. या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दलाने संपूर्ण परिसराला घेराव घातला आहे. या हल्ल्यात छत्तीसगडमधील दोन कामगारांचा मृत्यू झाला.  लष्कर-ए-तोयबाशी संलग्न असलेल्या 'द रेझिस्टन्स फ्रंट' (TRF) या संघटनेने शुक्रवारी रात्री साडेआठ वाजता कुलगामच्या केल्लम परिसरात दहशतवादी हल्ला करण्याचा प्रयत्न केला. ज्यात छत्तीसगड येथील एका मजूराचा मृत्यू तर दुसरा कर्मचारी जखमी झाला होता. या जखमी प्रवासी मजूरावर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना त्याचा आज सकाळी मृत्यू झाला. या हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाल्या आहेत. गुप्त माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसर सील केला असून मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबवली जात आहे. दोन्ही मजूर छत्तीसगडचे असल्याचे सांगितले जात आहे. मृताची ओळख २४ वर्षीय दीपक रात्रे आणि २८ वर्षीय भूपिंदर असं आहे. भूपिंदरला चिंताजनक अवस्थेत शेर-ए-काश्मीर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.  त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली परंतु त्याच्या छातीच्या उजव्या बाजूला गोळी लागली होती. त्यामुळे त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचं डॉक्टरांनी सांगितले होते. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हा दहशतवादी हल्ला शुक्रवारी रात्री सुमारे साडेआठ वाजता झाला.

**जाहीर नोटीस**

**उपविभागीय दंडाधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय**

७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे -४११००१

दुरध्वनी क्र.-०२०-२६३३०८३२ Email-sdopune@gmail.com

क्र. मृत्यु/रजि./एसआर/११६/२०२५ दिनांक:- १३/०७/२०२६

१) श्री. विशाल चंद्रकांत हरपळे
रा. पिंपरी सांडस ता. हवेली जि. पुणे - **अर्जदार**

**विरुध्द**

२) जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी/निबंधक,
ग्रामपंचायत पिंपरी सांडस - **जाबदेणार**

**विषय : जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की. वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार **श्री विशाल चंद्रकांत हरपळे रा पिंपरी सांडस ता हवेली जि पुणे** (अपिलार्थी) **यांनी त्यांचे आजी कै. जिजाबाई राणबा हरपळे,** यांचा, मृत्यु **दि. २१.०४.२०१४ रोजी मौजे पिंपरी सांडस येथे** झाला आहे. सदर मृत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्युची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि. १३/०७/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
(डॉ. यशवंत माने)
उपविभागीय दंडाधिकारी, हवेली
उपविभाग पुणे

ठिकाण : पुणे
दिनांक : १३/०७/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे

### मुसळधार पावसामुळे शहरातील विविध भागांत झाडपडीच्या घटना

**पिंपरी : दैनिक संध्या**

मागील दोन दिवसांपासून शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे तसेच जोरदार वाऱ्यामुळे पिंपरी चिंचवडमधील विविध भागांत झाडपडीच्या घटना घडल्या. या घटनांची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेत झाडे व तुटलेल्या फांद्या हटवून परिसर सुरक्षित करण्याची कार्यवाही केली. दोन दिवसात शहरातील सेक्टर २४, निगडी प्राधिकरण, फिनोलेक्स कंपनी परिसर, पिंपरी, ओम साई हौसिंग सोसायटी, आकुर्डी तसेच काजळे पेट्रोल पंप शेजारी, पुणे-नाशिक महामार्ग येथे झाडपडीच्या घटना घडल्या. अग्निशमन विभागाच्या पथकांनी त्वरित प्रतिसाद देत झाडे हटवली, वाहतुकीतील अडथळे दूर केले आणि परिसर नागरिकांसाठी सुरक्षित केला. पावसाळ्यात जोरदार वारे आणि सततच्या पावसामुळे झाडे उन्मळून पडण्याच्या किंवा मोठ्या फांद्या तुटण्याच्या घटना घडू शकतात. त्यामुळे नागरिकांनी अशा परिस्थितीत संयम राखून आवश्यक ती खबरदारी घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अग्निशमन विभागाने म्हटले आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अग्निशमन विभागाची सर्व पथके २४ तास सज्ज असून, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी त्वरित १०१ या क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच झाड कोसळलेल्या ठिकाणी अनावश्यक गर्दी करू नये, तुटलेल्या फांद्या तसेच विद्युत तारा किंवा वायरपासून सुरक्षित अंतर ठेवावे आणि स्वतः झाड किंवा फांद्या हटवण्याचा प्रयत्न करू नये असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने केले आहे.

### हिंजवडीत अनधिकृत होर्डिंग हटवताना अपघात; महाकाय क्रेन पलटी

**पिंपरी : दैनिक संध्या**

नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या आणि परिसराचे विद्रूपीकरण करणाऱ्या अनधिकृत जाहिरात फलकांविरोधात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) कठोर कारवाई हाती घेतली आहे. हिंजवडी येथील लक्ष्मी चौक परिसरात उभारण्यात आलेले तब्बल आठ अनधिकृत महाकाय होर्डिंग्ज हटविण्यात आले. मात्र, या कारवाईदरम्यान एक मोठी दुर्घटना घडली असून होर्डिंग हटवताना वापरण्यात आलेली क्रेन अचानक पलटी झाली. या अपघातात एक टेम्पो आणि हातगाडीचे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. 'पीएमआरडीए'च्या पाहणीत हिंजवडीतील लक्ष्मी चौक परिसरातील गट क्रमांक २६२ आणि २६३ मध्ये विनापरवाना आठ महाकाय जाहिरात फलक उभारण्यात आल्याचे आढळून आले होते. प्रशासनाने कारवाईचा इशारा दिल्यानंतर संबंधित फलकधारकांनी स्वतःहून सहा होर्डिंग्ज हटविले. उर्वरित दोन फलकांवर मात्र 'पीएमआरडीए'च्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाने थेट कारवाई करत ते जमीनदोस्त केले. गुरुवार (३० जुलै) आणि शुक्रवार (३१ जुलै) अशा सलग दोन दिवसांत ही मोहीम राबविण्यात आली. कारवाई दरम्यान एका महाकाय होर्डिंगचे लोखंडी स्ट्रक्चर हटविताना क्रेनचा तोल जाऊन ती पलटी झाली. यामध्ये जवळ उभ्या असलेल्या एका टेम्पो आणि हातगाडीचे नुकसान झाले. मात्र, घटनास्थळी उपस्थित कर्मचारी आणि नागरिक सुरक्षित राहिल्याने मोठा अनर्थ टळला. ही धडक कारवाई अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाचे सहआयुक्त हिंमत खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात तहसीलदार आशा होळकर, रवींद्र रांजणे, दक्षता विभागाचे पोलीस निरीक्षक पवन पाटील तसेच 'पीएमआरडीए'चे अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होते.

### पाणीपुरवठा योजनेची कामे विहित मुदतीत पूर्ण करा

**पिंपरी : दैनिक संध्या**

भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेंतर्गत करण्यात येत असलेली कामे विहित मुदतीत पूर्ण करा, असे निर्देश पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. पिंपरी चिंचवड शहराची वाढती पाण्याची मागणी लक्षात घेता भामा आसखेड धरणातून ६०.७९ द. ल. घ. मी. (१६७ द. ल. लि. प्रतिदिन) इतका पाणी कोटा आरक्षणास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली आहे. त्याअंतर्गत भामा आसखेड धरणातून पाणी आणण्याकरिता चालू असलेल्या विविध प्रकल्पास आज आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी भेट दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता दिपक पाटील, उपअभियंता दिनेश फाटक, कनिष्ठ अभियंता स्वप्नील पाटील यांच्यासह संबंधित कामांचे ठेकेदार व सल्लागार उपस्थित होते. आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेंतर्गत चालू असलेल्या भामा आसखेड धरण ते नवलाख उंबरे येथील बी.पी.टी.पर्यंतच्या १७०० मि.मी. व्यासाची उदंचन नलिका टाकणे, नवलाख उंबरे येथील बी.पी.टी. ते देहूपर्यंत १४०० मि.मी. व्यासाची गुरुत्व नलिका टाकणे तसेच भामा आसखेड धरण येथील जॅकवेल बांधणे या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष धरणाच्या पाण्याखालील १०० फूट खोल बोगद्याची (Intake Tunnel) पाहणी केली. तसेच या सर्व कामांचा आढावा घेऊन उर्वरित कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत संबंधित अधिकारी, कामाचे सल्लागार व ठेकेदार यांना सूचना दिल्या. पिंपरी चिंचवड शहराची भविष्यातील पाणी गरज लक्षात घेऊन भामा आसखेड पाणीपुरवठा योजना अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेतील सर्व कामांमध्ये गुणवत्ता आणि सुरक्षिततेची कोणतीही तडजोड न करता उर्वरित कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. शहराला नियोजित वेळेत या योजनेचा लाभ उपलब्ध होईल, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

### पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सेवेतून जुलै अखेर ३५ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने जूलै २०२६ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या २१ तसेच स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेल्या १४ अशा एकूण ३५ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, पिंपरी-चिंचवड कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे, नंदकुमार इंदलकर, मुख्य लिपिक माया वाकडे, विविध विभागांतील कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. जुलै २०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये लेखाधिकारी प्रकाश ज्ञानोबा जाधव, कार्यालय अधिक्षक दौलत मदगे, सहाय्यक उद्यान निरीक्षक सुरेश कोळेकर, कॉम्प्युटर ऑपरेटर सुरेखा झेंडे, ज्ञानेश्वर शेडगे, मुख्याध्यापक सविता जाधव, जयश्री गळीतकर, उप शिक्षिका संगीता रोकडे, उज्ज्वला तापकीर, शिला सोनवणे, सर्व्हेअर मुकुंद क्षिरसागर, सुरक्षा सुपरवायझर भारत भले, रखवालदार राजेंद्र रायकर, ईश्वर बहोत, चंद्रकात राऊळ, मजूर दत्तात्रय काळभोर, दत्तात्रय टोपे, दिलीप गव्हाणे, शंकर धुमाळ, सफाई सेवक अशोक कांबळे, ज्योतीराम खैरमोडे यांचा समावेश आहे. तर स्वेच्छा निवृत्त घेतलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी अरूण सुपे, कार्यकारी अभियंता राजेंद्र जावळे, मनोहर जावरानी, वायरलेस ऑपरेटर श्रीकृष्ण बाबर, दूरध्वनी चालक जालिंदर साखरे, मुकादम राकेश गायकवाड, वंदना ओव्हाळ, शालन करडे, सफाई कामगार राजू शिंदे, बापू गायकवाड, अनिता रेड्डी,नमिना चव्हाण, सफाई सेवक राणू गायकवाड आणि भारत गायकवाड यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी,सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार माया वाकडे यांनी मानले.

# पवना धरणातून ९२०० क्युसेकने विसर्ग

■ पिंपरी (दै. संध्या)

पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात आणि घाटमाथ्यावर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पवना धरण 99 टक्के भरले असून धरणातील पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी नदीपात्रातील विसर्ग वाढविण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे.

पवना धरण प्रकल्पाकडून दुपारी 4:15 वाजता जारी करण्यात आलेल्या सूचनेनुसार, सध्या पवना नदीपात्रात 7,880 क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू असून तो वाढवून 9,200 क्युसेक करण्यात येणार आहे. तसेच धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू राहिल्यास हा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढवून 15,000 क्युसेकपर्यंत नेण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सततच्या पावसामुळे नदी, नाले आणि ओढ्यांच्या पाणीपातळीत अचानक वाढ होऊ शकते. त्यामुळे पवना नदीच्या सखल भागात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने नदीकाठच्या ग्रामस्थ, नागरिक, शेतकरी आणि लाभधारकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.नदीपात्रातील शेती अवजारे, कृषी पंप, जनावरे तसेच इतर साहित्य तातडीने सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासन आणि जलसंपदा विभागाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पूर नियंत्रण कक्ष, पवना धरण प्रकल्प पवनानगर यांच्याकडून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यकतेनुसार पुढील माहिती जाहीर केली जाणार आहे.



## गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर समाजकार्यासाठी "समर्पण"

■ पिंपरी (दै. संध्या)

गुरुपौर्णिमा म्हणजे गुरुचरणी कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि समाजासाठी समर्पणाची भावना दृढ करण्याचा दिवस. या पावन पर्वाचे औचित्य साधत भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवडचे संघटन सरचिटणीस ॲड. मोरेश्वर शेडगे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती संचालित पुनरुत्थान समरसता गुरुकुलम, क्रांतिवीर चापेकर स्मारक आणि क्रांतिवीर चापेकर विद्यालयाच्या दुरुस्ती व बांधकामासाठी आर्थिक स्वरूपात देणगी अर्पण करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला.

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे पुनरुत्थान समरसता गुरुकुलम संकुलाचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे येथील विद्यार्थी, विद्यालय आणि गोशाळेला नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागला. या पार्श्वभूमीवर ॲड. शेडगे यांनी विद्यार्थी संकुलासाठी ५१ हजार रुपये, विद्यालयासाठी ५१ हजार रुपये अशी एकूण एक लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द केली. तसेच, गोशाळेसाठी एक टन चाऱ्याचीही मदत उपलब्ध करून देण्यात आली.

चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलममध्ये आयोजित गुरुपौर्णिमा उत्सवात ही देणगी पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. भारतीय जनता पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

यावेळी बोलताना ॲड. मोरेश्वर शेडगे म्हणाले, "गुरुंचे आशीर्वाद आणि समाजसेवेची प्रेरणा हीच खरी संपत्ती आहे. माझ्या वाढदिवसानिमित्त होणारा खर्च समाजोपयोगी कार्यासाठी वापरण्याचा संकल्प केला होता. गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिवशी गुरुचरणी कृतज्ञतेची ही छोटीशी अर्पणभावना व्यक्त करता आली, याचे मनस्वी समाधान वाटते." आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण, संस्कार आणि सर्वांगीण विकासासाठी पुनरुत्थान समरसता गुरुकुलम गेल्या अनेक वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करीत आहे. या संस्थेच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षणाचा प्रकाश पोहोचविण्याचे कार्य सुरू असून, या कार्याला हातभार लावण्याचा संकल्प ॲड. मोरेश्वर शेडगे यांनी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने प्रत्यक्ष कृतीतून साकारला. दरम्यान, पुनरुत्थान समरसता गुरुकुलम परिवाराच्या वतीने ॲड. मोरेश्वर शेडगे यांचा हृदयस्पर्शी सत्कार करण्यात आला. हा सन्मान स्वीकारताना त्यांनी तो समाजसेवेसाठी कार्यरत असलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याचा असल्याची भावना व्यक्त केली. या कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पिंपरी-चिंचवड कार्यवाह नरेंद्रजी पेंडसे, पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पुणे विभाग संघटन मंत्री प्रतीक पावडे, पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिवराव खाडे, 'ब' प्रभाग समितीचे अध्यक्ष मंदार देशपांडे, सामाजिक समरसता साहित्य परिषदेच्या शोभाताई जोशी, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या माजी संचालिका चंद्रकलाताई शेडगे, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षकवृंद आणि नागरिक उपस्थित होते.

## लोडशेडिंगमुक्त करण्यासाठी आमदार जगताप यांचा "मास्टर प्लॅन"

■ पिंपरी (दै. संध्या)

शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, ग्राहकसंख्या आणि विजेची मागणी लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवडची वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी चिंचवड विधानसभा क्षेत्राचे आमदार शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. वीज विषयक प्रलंबित कामांना गती देण्यासाठी आयोजित बैठकीत त्यांनी महापारेषण आणि महावितरणला कालबद्ध, परिणामकारक आणि भविष्यवेधी नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. पिंपरी चिंचवड मतदारसंघनिहाय वीज वितरण सनियंत्रण समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समित्यांमार्फत स्थानिक वीजसमस्यांचा नियमित आढावा घेतला जाणार आहे. महत्वाचे म्हणजे पिंपरी चिंचवड राजगुरुनगर, लोणावळासह नवीन परिमंडळाचा प्रस्ताव ठेवण्यात आला असून, यामुळे शहराला स्वतंत्र वीज परिमंडळ मिळून प्रशासकीय कामांना मोठी गती मिळणार आहे आणि ग्राहकांच्या तक्रारींचे जलद गतीने निवारण होण्यास मदत होणार आहे.

मुख्य म्हणजे पुढील सहा महिन्यांत पाषाण–सांगवी वीजवाहिनी, यशदा परिसरात नवीन वीज उपकेंद्र, पिंपरी-चिंचवड शहरासाठी आवश्यक नवीन वीज उपकेंद्रे आणि सबस्टेशनचा सविस्तर प्रकल्प अहवाल, गहुंजे येथील प्रस्तावित २२०/२२ केव्ही, ३०० एमव्हीए क्षमतेच्या अतिउच्चदाब उपकेंद्राच्या प्रस्तावाला गती देण्याबाबत चर्चा झाली.

अधिकाऱ्यांनी कोणती कामे पूर्ण करायची, प्रत्येक कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रस्ताव मुख्य कार्यालयाकडे कधी पाठविणार आणि मंजुरीपासून निविदा प्रक्रियेपर्यंत किती कालावधी लागणार, याचे निश्चित वेळापत्रक तयार करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या. केवळ प्रस्ताव तयार करून न थांबता दर महिन्याला उद्दिष्ट निश्चित करून प्रत्यक्ष प्रगतीचा आढावा घेण्यावर भर द्या असे स्पष्ट निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

# कासारवाडी रेल्वे क्रॉसिंग फाटक बंद करू नका

■ पिंपरी (दै. संध्या)



कासारवाडीगाव रेल्वे मार्गामुळे पूर्व व पश्चिम अशा दोन भागांत विभागले गेले असून, रेल्वे क्रॉसिंग फाटक क्रमांक–६१ हा या दोन्ही भागांना जोडणारा एकमेव व अत्यंत महत्त्वाचा संपर्कमार्ग आहे. हे फाटक कायमस्वरूपी बंद झाल्यास दररोज हजारो नागरिकांना अनावश्यकपणे मोठा वळसा घालावा लागेल. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन प्रवासावर, सामाजिक व आर्थिक व्यवहारांवर तसेच सर्वसामान्य जनजीवनावर विपरीत परिणाम होईल. फाटक बंद करण्याच्या प्रस्तावाचा पुनर्विचार करून फाटक पूर्ववत सुरू ठेवण्याची मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वे विभागाकडे केली आहे.

खासदार बारणे यांनी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक यांना याबाबत निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, मावळ लोकसभा मतदारसंघातील कासारवाडी येथील रेल्वे क्रॉसिंग फाटक क्रमांक–६१ कायमस्वरूपी बंद करण्याबाबत रेल्वे प्रशासनाकडून सूचना जारी करण्यात आली असून, त्यासंदर्भात स्थानिक नागरिकांनाही माहिती देण्यात येत आहे. या प्रस्तावाबाबत स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी तसेच विविध सामाजिक संघटनांकडून गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. कासारवाडीगाव रेल्वे मार्गामुळे पूर्व व पश्चिम अशा दोन भागांत विभागले गेले असून, रेल्वे फाटक क्रमांक–६१ हा या दोन्ही भागांना जोडणारा एकमेव व अत्यंत महत्त्वाचा संपर्कमार्ग आहे. कासारवाडी पश्चिम भागातील अनेक विद्यार्थी पूर्व भागातील श्री छत्रपती शाहू महाराज विद्यालयात शिक्षण घेत आहेत. फाटक बंद झाल्यास विद्यार्थ्यांना लांब व गैरसोयीचा मार्ग वापरावा लागेल. त्यामुळे त्यांच्या वेळेची, सुरक्षिततेची तसेच शिक्षणाची हानी होण्याची शक्यता आहे. याशिवाय कासारवाडी येथे दरवर्षी गणेश विसर्जन मिरवणूक, एक गाव–एक शिवजयंती मिरवणूक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रामनवमी, हिंदू नववर्ष (गुढी पाडवा), बसवराज महाराज मिरवणूक, ईद-ए-मिलाद तसेच श्री भैरवनाथ यात्रा व पालखी असे अनेक धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वी व सुरळीत आयोजनासाठी या रेल्वे फाटकाचा वापर केला जातो. फाटक बंद झाल्यास या पारंपरिक कार्यक्रमांच्या आयोजनात व व्यवस्थापनात गंभीर अडथळे निर्माण होतील आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींचा सामना करावा लागेल. याशिवाय अंत्यसंस्कार, अंत्ययात्रा तसेच इतर आपत्कालीन परिस्थितींमध्ये अग्निशमन दल, रुग्णवाहिका, पोलीस व इतर अत्यावश्यक सेवांकडूनही याच मार्गाचा वापर केला जातो. फाटक बंद झाल्यास आपत्कालीन सेवांच्या हालचालींमध्ये विलंब होण्याची शक्यता असून, त्यामुळे नागरिकांच्या जीवित व सुरक्षिततेवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. रेल्वे विभागामार्फत कासारवाडी रेल्वे क्रॉसिंग फाटक क्रमांक–६१ कायमस्वरूपी बंद करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र (NOC) प्राप्त करण्यात आले आहे.

### पर्यायी मार्ग गैरसोयीचा

अपर जिल्हाधिकाऱ्यांनी नाशिक फाटा जे.आर.डी. टाटा पूल मार्गे शंकर मठ मार्ग हा पर्यायी मार्ग सुचविला आहे. मात्र हा मार्ग स्थानिक नागरिकांसाठी अत्यंत लांब व गैरसोयीचा आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, महिला तसेच दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी हा मार्ग व्यवहार्य नाही. शिवाय या मार्गावर आधीच मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्यामुळे सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. त्यामुळे जनहिताचा विचार करून कासारवाडी रेल्वे क्रॉसिंग फाटक क्रमांक–६१ कायमस्वरूपी बंद करण्याच्या प्रस्तावाचा तातडीने पुनर्विचार करण्यात यावा. रेल्वे फाटक पूर्ववत सुरू ठेवण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली आहे.

## पाच दिवसांपासून पाण्याची गळती

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने शहरात १५ टक्के पाणी कपातीची घोषणा केलेली असताना, घरकुल स्पाईन रोड चौकातील मुख्य पाणीपुरवठा वाहिनीच्या व्हॉल्वमधून गेल्या पाच दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती सुरू आहे. या गळतीमुळे आतापर्यंत लाखो लिटर पाणी वाया गेल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते मारुती जाधव यांनी केला आहे.

सदर ठिकाणी पाणी सातत्याने वाहत असून परिसरात चिखल व पाण्याचे डबके निर्माण झाले आहेत. त्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, घरकुल स्पाईन रोड हा वर्दळीचा मार्ग असून अनेक महापालिका कर्मचारी व अधिकारी दररोज याच रस्त्यावरून ये-जा करतात. तरीही पाच दिवसांपासून सुरू असलेल्या या गळतीकडे कोणत्याही संबंधित विभागाने गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचे दिसून येत आहे.

# राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय आणि क्वालकॉम टेक्नॉलॉजी यांच्यात करार

■ पिंपरी (दै. संध्या)

जेएसपीएम संचलित ताथवडे येथील राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय (आरएससीओई), यआणि जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य क्वालकॉम टेक्नॉलॉजीज सोबत मुख्य प्रशिक्षण करार आणि कार्य अंमलबजावणी करार झाला. स्वाक्षऱ्या करून विद्यार्थ्यांसाठी ५जी तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील जागतिक दर्जाच्या प्रशिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. या करारावर दोन्ही संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या करारासाठी जेएसपीएमचे कॅम्पसचे संचालक डॉ सुधीर भिलारे,आरएससीओईचे संचालक डॉ. ए. एम. बडधे , इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. एस. सी. वागज, अधिष्ठाता डॉ. सौरभ तायडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. क्वालकॉम टेक्नॉलॉजीजच्या सिमरन मेहरोत्रा यांचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभले. या कराराचा समन्वय, पाठपुरावा व यशस्वी अंमलबजावणी प्रा. विजय बरकडे यांनी केली. या सहकार्यामुळे जेएसपीएम आरएससीओई मधील विद्यार्थ्यांना ५जी तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, वायरलेस दळणवळण या क्षेत्रांतील उद्योगाभिमुख प्रशिक्षण, आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रमाणपत्रे आणि जागतिक उद्योगक्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्याची सुवर्णसंधी



उपलब्ध होणार आहे. या उपक्रमामुळे संस्थेच्या उद्योग–शैक्षणिक सहकार्याला, कौशल्यविकासाला आणि विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेला मोठी चालना मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ज्ञानवर्धिनी विद्यालयाचा नाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक

**चाकण : दैनिक संध्या**

बालरंगभूमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इतिहास महाराष्ट्राचा या अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन चरित्रावर आधारित सामूहिक नाट्य स्पर्धेत स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला. या विद्यालयाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अहिल्याबाईंचा वज्रनिर्धार या नाटकाने आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाने परीक्षकांची मने जिंकली. स्वरा रांधवन, तनिष्का दिघे, समीक्षा वडोदे, रेवा वाबळे, स्वरा रेपाळे, प्रणित गिरासे, अथर्व जाधव व आराध्या हेगडे यांनी या नाट्य स्पर्धेत भाग घेतला होता. या नाटकाचे लेखन उर्मिला कोबल यांनी, तर अर्चना माळी यांनी दिग्दर्शन केले आहे. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट अभिनयासोबतच शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यालयाला हा मानाचा बहुमान मिळाला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, उपाध्यक्ष राजेंद्र गोरे, संचालक अंकुश पवार, विष्णू गोरे, ओंकार गोरे, प्राचार्या प्रमिला गोरे आदींनी सर्व कलाकार, विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले. यावेळी बोलताना नगराध्यक्षा मनीषा गोरे म्हणाल्या, बालरंग भूमीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कलाकारांना आपले गुण दाखवण्यासाठी खुले व्यासपीठ मिळते. कलाकारांच्या कलेची कदर करण्याकरता सांस्कृतिक कार्यक्रमांचीही तितकीच आवश्यकता आहे."

### राहुलदादा कांडगे यांनी रंगवला गप्पांचा फड

**चाकण : दैनिक संध्या**

रोजची धावपळ, मार्केटमधल्या ताज्या घडामोडींचा शोध, कामांचा डोंगर आणि



त्यातून मिळणारी थोडीशी उसंत... तसेच चाकण शहराची सफर मारत असताना चाकण नगरीचे नगरसेवक राहुलदादा कांडगे यांनी शहरात गप्पांचा चांगलाच फड रंगवला. चाकण नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे यांचे पती राहुल दादा कांडगे हे काही कामामुळे चांगलेच थकून-भागून आले होते. अखेर न्यूज सेंसेशनपेक्षा शरीराला ऊर्जा गरजेची आहे हे ओळखून, त्यांनी आपला मोर्चा थेट रुद्राक्ष हॉटेलच्या दिशेने वळवला. यावेळी त्या ठिकाणी त्यांचे जिवलग मित्र अमर इंगळे, योगेश राजापूरकर उपस्थित होते. कडाडून लागलेली भूक आणि समोर गरमागरम भजी अन् वाफाळलेला चहा. हातात चहाचा कप घेताच राहुलदादा कांडगे यांना भारावून आले. मग काय? चहाची थर्मास आणि गप्पांचा फड रंगला. राहुल दादा यांचा थकवा कुठल्या कुठे पळून गेला. मार्केटमध्ये काय चाललंय? पासून ते शहरात काय शिजतंय, इथपर्यंत गप्पांची रंगतदार जुगलबंदी रंगली. भजीचा प्रत्येक घास आणि चहाच्या प्रत्येक घोटासोबत गप्पांचा फड असा रंगला की, कामाच्या ताणतणावाचा तिथेच पंचनामा झाला. अमर इंगळे व योगेश राजापूरकर यांनी सांगितले की, राहुलदादा यांना गरिबांच्या कष्टाची जाणीव आहे. कोणाला कसलीही अडचण असली तरी दादा पुढे धावून जातात. प्रत्येक प्रश्न मार्गी लावण्याचे धाडस राहुल दादा यांच्याकडे असल्याने चाकण शहरात त्यांच्या नावाचा मोठा दबदबा आहे.

### युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पुणे जिल्हा सचिवपदी सुदर्शन दरेकर यांची नियुक्ती

**नारायणगाव: दैनिक संध्या**

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारिता क्षेत्रात सध्या मोठी स्पर्धा निर्माण झाली असून, समाजाप्रती उत्तरदायित्व जपणारा पत्रकार हा



जागरूक आणि प्रभावी घटक मानला जातो. अशा परिस्थितीत युवा पत्रकारांना संघटित करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पुणे जिल्हा कार्यकारिणीची सर्वसाधारण सभा नुकतीच शिरूर येथे पार पडली. संघाचे संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख यांच्या मार्गदर्शनाखाली व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शकील मणियार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत शिरूर शहरातील पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे सुदर्शन दरेकर यांची युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पुणे जिल्हा सचिवपदी नियुक्ती करण्यात आली.नियुक्तीचे पत्र संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख यांनी प्रदान केले. पत्रकारितेतील सक्रिय योगदान, सामाजिक भान आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत दरेकर यांना जिल्हा कार्यकारिणीत महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. नियुक्तीनंतर बोलताना सुदर्शन दरेकर यांनी संघटनेची ध्येय-धोरणे अधिक प्रभावीपणे राबविणे, ग्रामीण भागातील पत्रकारांना संघटित करणे आणि पुणे जिल्ह्यात संघटनेचा विस्तार करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली. दरेकर यांच्या या नियुक्तीचे पत्रकार, सामाजिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून स्वागत करण्यात येत असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### दूध भेसळ प्रकरणात कठोर कारवाईची मागणी

**नारायणगाव : दैनिक संध्या**

आंबेगाव तालुक्यातील गाजत असलेल्या दूध भेसळ प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अद्याप फरार असलेल्या 13 आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी तसेच भेसळयुक्त दूध स्वीकारणाऱ्या संबंधित दूध प्रकल्पांवरही कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुणे जिल्हाध्यक्ष मा. देवदत्तजी निकम यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त मा. तुकाराम मुंडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी दूध भेसळ प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संपूर्ण साखळीची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. भेसळ करणाऱ्यांसह भेसळयुक्त दूध स्वीकारून प्रक्रिया करणाऱ्या संबंधित दूध प्रकल्पांचीही चौकशी करून त्यांच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली. दूध भेसळ हा केवळ आर्थिक गुन्हा नसून जनतेच्या आरोग्याशी खेळ करणारा गंभीर अपराध आहे. त्यामुळे या प्रकरणातील कोणत्याही दोषीला अभय न देता सर्व संबंधितांवर कठोर आणि निष्पक्ष कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे आंबेगाव तालुकाध्यक्ष विशाल वाबळे, शंकरराव टेमगिरे आणि विशाल भोर उपस्थित होते.

# 'विद्याव्हॅली'च्या विद्यार्थ्यांनी फोडली ज्वलंत समस्येला वाचा

■ चाकण (दै. संध्या)

जनावरांना चालताना लाज वाटेल असे झालेले रस्ते, प्रचंड वाहतूक कोंडी, कचऱ्यातून सुटलेली दुर्गंधी नागरिकांचा गुदमरलेला श्वास आदी ज्वलंत समस्यांना चाकण येथील विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ऑन दी स्पॉट जाऊन ज्वलंत समस्यांना वाचा फोडली.

एस.पी.देशमुख शिक्षण संस्थेच्या चाकण येथील विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी एक पत्रकार म्हणून ( ॲझ अ रिपोर्टर' ) या अनोख्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा विभागाच्या प्रतिनिधींनी सलग आठ दिवस आयोजित केलेल्या या उपक्रमाला प्रशालेच्या प्राचार्या स्वाती रणदिवे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

स्पर्धेची विशेष बाब म्हणजे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन पत्रकाराची भूमिका पार पाडली. चाकण व परिसरातील वाहतूक कोंडी, रस्त्यांवरील खड्डे, तसेच त्यामुळे शालेय विद्यार्थी, शालेय बस, ज्येष्ठ नागरिक, कामगार वर्ग आणि व्यावसायिक यांना होणाऱ्या अडचणींचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहणीद्वारे अभ्यास करून पोलखोल केला. विद्यार्थ्यांनी चाकणकर नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांची मते जाणून घेतली. प्रत्यक्ष आलेल्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांना पत्रकारितेतील निरीक्षण, प्रश्न विचारण्याची कला, तथ्य पडताळणी, संवाद कौशल्य आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा प्रचंड अनुभव आला.

या उपक्रमाचा उद्देश चाकण परिसरातील ज्वलंत समस्यांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधून त्यावर तातडीने उपाययोजना व्हाव्यात, तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि जबाबदार पत्रकारितेची मूल्ये रुजवणे हा होता. एस.पी. देशमुख शिक्षण संस्थेचे संस्थापक साहेबराव देशमुख, अध्यक्ष शामराव देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहिणी देशमुख आदींनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले.

### ... हीच खरी पत्रकारिता

" शालेय जीवनात विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, धाडस व अभ्यासपूर्ण प्रयत्नांचे कौतुक होणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन वस्तुस्थिती समजून घेणे आणि ती जबाबदारीने समाजासमोर संवादातून मांडणे हीच खरी पत्रकारितेची सुरुवात म्हणावी लागेल. अशा अभिनव उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रात काम करण्याची संधी मिळते."

- स्वाती रणदिवे, प्राचार्या, विद्याव्हॅली प्रशाला, चाकण.



## भोमाळे गावात स्मशानभूमी नसल्याने ताडपत्रीखाली अंत्यसंस्कार करण्याची ग्रामस्थांवर वेळ

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

खेड तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागातील भोमाळे गावात स्मशानभूमीचा अभाव असल्याने ग्रामस्थांना अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. नुकत्याच झालेल्या एका अंत्यविधीवेळी मुसळधार पावसापासून बचाव करण्यासाठी ताडपत्री उभारून त्याखाली अंत्यसंस्कार करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली. या घटनेमुळे प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.



भोमाळे गावातील एका ग्रामस्थांचे गुरुवारी निधन झाले. मात्र गावात स्वतंत्र स्मशानभूमी नसल्याने पावसाळ्यात अंत्यविधी करण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला. अखेर ग्रामस्थांनी ताडपत्रीचा आधार घेत अंत्यसंस्कार पूर्ण केले. या घटनेने दुर्गम आदिवासी भागातील मूलभूत सुविधांचा अभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील अनेक आदिवासी गावे आजही मूलभूत सुविधांपासून वंचित असून, दैनंदिन गरजांसाठीही नागरिकांना संघर्ष करावा लागत आहे. शासन विविध विकास योजनांची घोषणा करत असले, तरी दुर्गम भागातील अनेक प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

भोमाळे गावात भीमा नदीकाठी सुमारे तीन गुंठे जागा स्मशानभूमीसाठी एका शेतकऱ्याच्या सातबाऱ्यावर आरक्षित असून, या कामासाठी निधीही मंजूर झाल्याचे सांगितले जाते. मात्र जागा हस्तांतरणाची प्रक्रिया स्थानिक वाद आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे रखडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत खेड तहसील कार्यालयाकडे अनेकवेळा निवेदने देऊनही प्रश्न मार्गी लागलेला नसल्याने लवकरात लवकर स्मशानभूमीचे काम सुरू न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## जिल्हा सत्र न्यायाधीशांनी उलगडला बालगृहातील मुलींसमोर जीवन प्रवास

■ सासवड(दै. संध्या)

"मुलींनो, मी माझेच उदाहरण तुम्हाला देतो..."मी आठवी नववीत शिकत असताना आमच्या शेतात जाण्याचा रस्ता बसस्थानकावरून जात असे. तिथून लाल दिव्याची एक गाडी जाताना दिसायची. ती कलेक्टरची गाडी असल्याचे बाबांनी सांगितले आणि त्याच क्षणी माझ्या मनात कलेक्टर होण्याचे स्वप्न निर्माण झाले. दुर्दैवाने कलेक्टर -आयएएस अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही, पण जिद्द सोडली नाही. त्याच चिकाटीमुळे आज मला जिल्हा सत्र न्यायाधीश या सर्वोच्च सांविधानिक पदावर सेवा करण्याची संधी मिळाली. त्यामुळे परिस्थिती कितीही कठीण असली तरी ती पूर्ण करण्यासाठी अथक प्रयत्न करा, “मोठी स्वप्ने पाहा, न्यायाधीश व्हा आणि समाजासाठी जगा”, या भावनिक शब्दांनी आपल्या मनोगताची सुरुवात करत पुणे जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश न्या. अरविंद वानखेडे यांनी बालगृहातील विद्यार्थिनींसमोर आपल्या आयुष्याचा प्रेरणादायी प्रवास उलगडला. बुलढाणा जिल्ह्यातील एका छोट्याशा खेड्यातील मुलगा ते पुणे जिल्ह्याचा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हा त्यांचा प्रवास ऐकताना उपस्थित विद्यार्थी, शिक्षक आणि मान्यवर भारावून गेले. पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण, येथे गुरुवार, दि. ३० जुलै २०२६ रोजी आयोजित "गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात" ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी शिक्षणात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. बालगृहातील मुलींशी अत्यंत आपुलकीने संवाद साधताना त्यांनी न्यायव्यवस्थेतील संधी, शिक्षणाचे महत्त्व आणि ध्येयवादी जीवनाची प्रेरणा दिली. "तुमच्यापैकी अनेक मुली उद्या न्यायाधीश, प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर किंवा समाजसेविका होऊ शकतात.

## पोलीस अधिकारी बाळासाहेब सकाटे यांचा सेवानिवृत्ती निमित्त विशेष सन्मान

■ नारायणगाव (दै. संध्या)

पोलीस अधिकारी बाळासाहेब सकाटे हे पोलीस खात्याच्या प्रदिर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम मा.वरिष्ट पोलीस निरीक्षक श्रीहरी बहिरट साहेब कोर्ट आवार पुणे शहर यांच्या अध्यक्षतेखाली सेवानिवृत्ती समारंभ घेण्यात आला.

यावेळी वरिष्ट पोलीस निरीक्षक श्रीहरी बहिरट साहेब म्हणाले, "सेवानिवृत्तीचा काळ हा खऱ्या अर्थाने आनंद घेण्याचा आणि आनंद दुसऱ्याला देण्याचा असतो." पोलीस खात्यात भरती झाल्यानंतर आपल्या अंगावरची जी वर्दी असते." ती खऱ्या अर्थाने भाग्याने मिळालेली असते. 'त्या संधीचं सोनं या विभागातील पोलीस अधिकारी बाळासाहेब सकाटे यांनी निश्चित केले. त्यांच्या कर्तृत्वाचा आदर्श इतर सर्व पोलीस कर्मचारी, अधिकारी यांनी घेतला गेला पाहिजे". "आपल्या वर्दीशी किती



प्रामाणिक असावे ?याचे उत्तम उदाहरण म्हणजे बाळासाहेब सकाटे आहेत"!. पोलीस खात्यात काम करत असताना.आपणास वेळ मिळाला नसेल. ती वेळ आता तुम्ही सगळ्यांसाठी द्या.ज्या ज्या इच्छा, अपेक्षा आपल्या राहिल्या असतील. त्या आपण सेवानिवृत्तीनंतर पूर्ण करा.आनंद घ्या. आणि उत्तम आरोग्य जपा. जिल्हा न्यायालय शिवाजीनगर येथील पोलीस अधिकारी बाळासाहेब सकाटे यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने, सुधीर धावडे सहायक पोलिस उपनिरीक्षक, विलास कांबळे सहायक पोलिस उपनिरीक्षक, राजेंद्र गुरव सहायक पोलिस उपनिरीक्षक, शेलार पोलीस उपनिरीक्षक ,भोंग पोलीस उपनिरीक्षक, सूर्यवंशी महिला पोलिस अंमलदार, प्रा. काशिनाथ आल्हाट यांनी मनोगत व्यक्त

## चाकण लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी सुनिता सोरटे

■ चाकण (दै. संध्या)

येथील चाकण लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी सुनिता सुरेश सोरटे यांची, तर सीमा गणेश कड यांची सचिवपदी निवड करण्यात आली.

अनुबंध सेवेचा... वारी समर्पणाची... या संकल्पनेवर आधारित चाकण लायन्स क्लब कार्यरत आहे. मल्टिपल कौन्सिलचे चेअरमन फत्तेचंद रांका यांच्या हस्ते चाकण लायन्स क्लबच्या नविन पदाधिकाऱ्यांना आपापले अधिकार प्रदान करण्यात आले. आनंद आंबेकर व डॉ. दिपक शहा यांनी नवीन सदस्यांचे कौतुक केले. याप्रसंगी झोन चेअरपर्सन विशाल गोस्वामी, पदग्रहण समारंभाचे अध्यक्ष प्रकाश मुटके, व्हाईस चेअरमन अपर्णा कानडे, नगरसेवक धीरज मुटके, माजी अध्यक्ष सुरेश कानडे, अक्षय जाधव, ऐश्वर्या जाधव, बाळासाहेब मुटके, सुलोचना शिर्के, सुनील पठारे, उल्हास शिर्के, लक्ष्मण नाणेकर, गणेश कड, अविनाश सोनवणे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ



मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुनिता सोरटे यांनी सांगितले की,"अध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत चाकण लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजाची सेवा करताना भूखमुक्ती, मधुमेह नियंत्रण, दृष्टी सुरक्षा, पर्यावरण संरक्षण, बालपण कर्करोग निदान, रक्तदान शिबिर, नेत्रदान शिबिर, सर्व प्रकारची शिबिरे घेण्यात येणार आहेत." यावर्षीच्या संचालक मंडळामध्ये धीरज मुटके, दिलीप परदेशी, प्रकाश मांजरे, डॉ. रमेश जाधव, सुवर्णा मुटके, अशोक शेवकरी, तुषार गोरे, विलास मांजरे, शंकर गवते, डॉ. रश्मी जाधव, सुरेश सोरटे आदींचा समावेश आहे. फत्तेचंद रांका यावेळी म्हणाले," चाकण लायन्स क्लबचे कामकाज कौतुकास्पद आहे. विकास कामांच्या बाबतीत चाकण लायन्स क्लबचे नाव प्राधान्याने घेतले जाते. या क्लबचा इतरांनी आदर्श घ्यावा." याप्रसंगी गुणवंतांचा सन्मान, अनाथांना धान्य वाटप करण्यात आले.

ऐश्वर्या जाधव यांनी स्वागत केले. बाळासाहेब मुटके यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाश मुटके यांनी आभार मानले.

# शिंदवणे घाट वनक्षेत्र बनले कचरा डेपो; दोषींवर कठोर कारवाई मागणी

■ उरुळी कांचन(दै. संध्या)

हवेली तालुक्यातील शिंदवणे घाटातील वनविभागाच्या हद्दीत रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत अज्ञात व्यक्तींमार्फत कचऱ्याने भरलेल्या गाड्या टाकल्या जात असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या बेकायदेशीर कचरा टाकण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय वनक्षेत्रातील जनावरे व वन्यजीवांनाही याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

वनविभागाच्या हद्दीत सुरू असलेला हा प्रकार प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. रात्रीच्या वेळी सर्रास कचऱ्याच्या गाड्या येऊन कचरा टाकत असताना संबंधित यंत्रणांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे. या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेत दोषींवर कठोर कारवाई करावी, कचरा टाकणाऱ्या वाहनांचा शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत आणि वनक्षेत्राचे संरक्षण करण्यासाठी नियमित गस्त वाढवावी अशी मागणी मल्हार केसरी पैलवान शिवाजी मुरलीधर महाडिक यांनी केली आहे.

वनक्षेत्र हे कचरा टाकण्याचे ठिकाण नाही. काही बेजबाबदार लोकांच्या कृत्यामुळे पर्यावरणाची हानी होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट असून वनविभाग व संबंधित प्रशासनाने तातडीने कारवाई करून शिंदवणे घाटातील वनक्षेत्र कचऱ्याच्या विळख्यातून मुक्त करावे, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.

### वाहन चालकावर कठोर कारवाई

शिंदवणे वनविभागाच्या हद्दीत रात्रीची गस्त वाढवून कचरा टाकणाऱ्या वाहन चालकावर कठोर कारवाई केली जाईल, तसेच नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे कि असे कोणी वनविभागाच्या हद्दीत कचरा टाकताना आढळल्यास त्या वाहनाचा फोटो किंवा नंबर द्यावा जेणेकरून त्यांच्यावर कारवाई करता येईल.

- संभाजी गायकवाड- वनविभाग अधिकारी हवेली






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# आण्णा भाऊंचे विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : नूतनीकृत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण

■ मुंबई (दै. संध्या)

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. चिरागनगर येथे त्यांच्या स्मारक व संशोधन केंद्राच्या उभारणीसह भायखळा येथील नूतनीकृत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण हा त्या दिशेने महत्त्वाचा टप्पा असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. हे नाट्यगृह त्यांचा विचार आणि साहित्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणारे केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नूतनीकृत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, बृहन्मुंबईतील लोकप्रतिनिधी, महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, महानगरपालिका समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, स्थानिक नगरसेवक यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे वास्तव्य असलेल्या चिरागनगर येथे स्मारक उभारण्याच्या मागणीची पूर्तता करत राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक आणि संशोधन केंद्र उभारण्याचे काम सुरू केले आहे. त्याचबरोबर महानगरपालिकेने नूतनीकरण केलेल्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण होणे, ही आनंदाची बाब आहे. येथे नाट्यप्रयोगांसाठी आवश्यक असलेल्या आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मंचाची क्षमता वाढविणे, कलाकारांसाठी सुसज्ज ग्रीनरूमची व्यवस्था करणे, यासह विविध सुधारणा करण्यात आल्याने आता सर्व प्रकारची दर्जेदार नाटके आणि सांस्कृतिक कार्यक्रम येथे सादर करता येतील. अभिजात कला, संस्कृती आणि साहित्य यांना प्रोत्साहन देतानाच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सांस्कृतिक संधी पोहोचविण्याचे कार्य या माध्यमातून व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करुन नाट्यगृहाबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी महानगरपालिकेचे कौतुक केले.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य वास्तववादी असून त्या काळातील सामाजिक परिस्थिती, अन्याय, संघर्ष आणि कामगारांचे जीवन यांचे प्रभावी चित्रण त्यातून दिसून येते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे आलेल्या अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लेखणीच्या बळावर सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला. त्यांच्या साहित्याची व्याप्ती जागतिक स्तरावर पोहोचली असून त्यांच्या साहित्याचे २७ भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची आणि मराठी भाषेची कीर्ती जगभर पोहोचविण्यात त्यांचे योगदान अमूल्य असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी विविध ठिकाणी स्मारके - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

क्रांतिसूर्य साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपले आयुष्य शोषित, पीडित, दलित, कष्टकरी आणि वंचित समाजाच्या हक्कांसाठी समर्पित केले. त्यांच्या साहित्याने आणि शाहिरीने सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली; तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात जनजागृती करून जनसामान्यांना प्रेरित करण्याचे ऐतिहासिक कार्य केले, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले.




राज्य शासनाच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी विविध ठिकाणी स्मारके उभारली जात असून सांगली जिल्ह्यातील जन्मगाव असलेल्या वाटेगाव येथेही स्मारकाची उभारणी करण्यात येत आहे.

अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे संघर्षमय जीवनाचे वास्तववादी चित्रण करणारे आहे. नाटक हा मराठी माणसाच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग असून नाट्यगृहाच्या नूतनीकरणामुळे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृह आधुनिक, सुसज्ज आणि कलाकारांसाठी उपयुक्त झाले आहे. या नाट्यगृहातून नवोदित कलाकारांना संधी मिळेल; तसेच अण्णा भाऊ साठे यांचे विचार अधिक व्यापक स्तरावर पोहोचतील, असा विश्वासही उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी व्यक्त केला.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाच्या संघर्षाला शब्दबद्ध करत सामान्य माणसाला नायकाच्या भूमिकेत उभे केले. नूतनीकृत नाट्यगृह हे त्यांच्या विचारांना आणि सांस्कृतिक वारशाला तसेच नव्या कलाकारांना आणि नव्या विचारांना व्यासपीठ उपलब्ध करून देईल, असे प्रतिपादन मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकाद्वारे केले.

महापौर तावडे म्हणाल्या की, सुमारे 40 कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले हे अत्याधुनिक वातानुकूलित नाट्यगृह 761 आसनक्षमतेचे आहे. त्यामध्ये ग्रीनरूम, मेकअप रूम, विद्युत जनित्र, सीसीटीव्ही यंत्रणा आणि आधुनिक अग्निसुरक्षा सुविधा उपलब्ध आहेत.

नाट्यगृह परिसरात पुस्तक विक्री दालन; तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनपटावर आधारित प्रदर्शनाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. येत्या काळात हे नाट्यगृह नाटकांसह विविध सांस्कृतिक आणि सार्वजनिक उपक्रमांचे महत्त्वाचे केंद्र, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी आभार प्रदर्शन करताना या नाट्यगृहाच्या नुतनीकरणामध्ये सहकार्य केलेल्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६ साठी अर्ज करण्याचे आवाहन

■ मुंबई (दै. संध्या)

राष्ट्र व राज्य निर्माणामध्ये युवकांची महत्वपूर्ण भूमिका असून मोठ्या संख्येने युवा वर्ग / संस्था जिल्ह्यात सामाजिक कार्य करीत आहेत. युवामध्ये असलेल्या सुप्तगुणांना वाव देणे. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याला प्रोत्साहन देणे, त्यांचा गुणगौरव करणे आवश्यक आहे. राज्याचे युवा धोरण अंतर्गत युवांच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यासाठी जिल्हा युवा पुरस्कार शासन निर्णय दि. १२ जानेवारी २०१३ नुसार देण्यात येतात.

२०२५-२६ या वर्षात जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार प्रत्येक जिल्ह्यातील १ युवक, १ युवती व १ नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येणार आहेत. या पुरस्काराचे स्वरुप युवक-युवती यांना रोख रु.१०,०००/- संस्थेस रु. ५०,०००/- तसेच गौरवपत्र, सन्मानचिन्ह असे राहणार आहे. जिल्हा




युवा पुरस्कारासाठी युवक अथवा युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था यांची गत तीन वर्षामध्ये केलेल्या कामगिरीचे मूल्यांकन विचारात घेण्यात येणार असून राज्य युवा पुरस्कार २०२५-२६ साठी अर्ज १५ सप्टेंबर २०२६ रोजी पर्यत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक असणार आहे. या अर्जाचा नमुना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय किंवा https://sports.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध राहतील.

# भिवंडी येथील दुर्घटनाग्रस्त इमारतीची गिरीश महाजन यांनी केली पाहणी

■ मुंबई (दै. संध्या)

भिवंडी येथे घडलेल्या दुर्दैवी इमारत दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी बचाव आणि मदतकार्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून घेतली तसेच प्रभावीपणे बचावकार्य राबविण्याच्या सूचना देत, प्रभावित नागरिकांना आवश्यक ती सर्व मदत तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले.

मंत्री गिरीश महाजन म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घटनेची संपूर्ण माहिती दिली असून त्यांच्याशी चर्चा केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी शासनाच्या वतीने सर्वतोपरी मदत कार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. शासनाच्या वतीने दुर्घटनेतील मृत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाखाची मदत यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी जाहीर केली. तसेच जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय उपचार मिळावेत आणि आपत्तीग्रस्तांना शासनाकडून सर्वतोपरी मदत करण्यात येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. यावेळी दुर्घटनेतील मृत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आपण सहभागी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

आपत्तीच्या काळात प्रशासन, बचाव पथके आणि स्थानिक यंत्रणांमध्ये समन्वय ठेवून नागरिकांना तातडीने मदत पोहोचविण्यावर भर देण्याचे आवाहनही मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

सदर इमारतीच्या शेजारील इमारतीतील नागरिकांचे देखील स्थलांतर करण्यात आले असून त्यांची सर्वतोपरी व्यवस्था करण्यात यावी असे निर्देश त्यांनी यावेळी प्रशासनास दिले.

# डिजिटल नकाशांतून जलसमृद्धीकडे

## ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशांनी घडवले महाराष्ट्रातील जलनियोजनाचे नवे पर्व

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.०अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी अत्याधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (Geographic Information System – GIS) विकसित करून राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे यंत्रणेच्या वेबसाईटवर प्रथमच सर्वसामान्यांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन, भूजल पुनर्भरण, जलसंधारणाची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामस्तरावरील विकास नियोजनाला नवी गती मिळाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, लोकसहभाग आणि शाश्वत जलव्यवस्थापन यांच्या संगमातून जलसमृद्ध महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने राज्याने उचललेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

“पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे; परंतु त्या प्रत्येक थेंबाचे शास्त्रशुद्ध नियोजन हीच खरी जलसुरक्षेची गुरुकिल्ली आहे.”

एखाद्या गावात नवी विहीर कोठे घ्यावी? पाणी कोणत्या दिशेने वाहते? डोंगराच्या उतारावर सलग समतल चर (Continuous Contour Trenches – CCT) नेमके कुठे घ्यावेत? शेततळे, सिमेंट नाला बांध (CNB), गॅबियन किंवा इतर जलसंधारणाची कामे कोणत्या ठिकाणी सर्वाधिक परिणामकारक ठरतील? एखाद्या भागात भूजल पुनर्भरणाची क्षमता किती आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पूर्वी अनेक दिवस क्षेत्र पाहणी, कागदी नकाशे, स्थानिक अनुभव आणि विविध विभागांकडील माहितीवर अवलंबून राहावे लागत असे.

आज मात्र ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. संगणकाच्या पडद्यावर किंवा मोबाईलच्या स्क्रीनवर एका क्लिकमध्ये संपूर्ण पाणलोट डोळ्यासमोर उभा राहतो. नदी-नाले, ओघोळ, जमिनीचा उतार, मातीचा प्रकार, गावांच्या सीमा, गट क्रमांक, भूजल पुनर्भरणाची क्षमता आणि जलसंधारणाच्या उपचारांची योग्य ठिकाणे यांची माहिती आता डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाली आहे. या परिवर्तनामागे आहे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (WDC:PMKSY २.०) अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी उभारलेली आधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (GIS).या उपक्रमाचे सर्वात मोठे यश केवळ GIS तंत्रज्ञानाचा वापर नव्हे, तर महाराष्ट्रातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट (Micro Watershed) नकाशे प्रथमच सर्वसामान्य नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देणे, ही या उपक्रमाची ऐतिहासिक कामगिरी आहे. शासनाच्या तांत्रिक दालनात मर्यादित असलेली माहिती आज प्रत्येक शेतकरी, ग्रामपंचायत, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकापर्यंत पोहोचली आहे. ही केवळ डिजिटल सेवा नाही; तर जलसंधारणाच्या ज्ञानाचे लोकशाहीकरण आहे. महाराष्ट्र हा भौगोलिकदृष्ट्या विविधतेने नटलेला प्रदेश आहे. कोकणातील मुसळधार पाऊस, विदर्भातील उष्ण हवामान, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, पश्चिम महाराष्ट्रातील सिंचन व्यवस्था आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगा..प्रत्येक भागाची जलस्थिती वेगळी आहे. परंतु या सर्व भागांना एकच समान आव्हान आहे, ते म्हणजे पावसाचे पाणी अधिकाधिक प्रमाणात जमिनीत मुरविणे आणि भविष्यासाठी साठवणे. हवामान बदलामुळे पावसाचा कालावधी कमी होत आहे, तर अल्पावधीत अतिवृष्टीचे प्रमाण वाढत आहे. परिणामी मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते. त्याचबरोबर मृदा धूप वाढते, भूजल पातळी घटते आणि शेतीची उत्पादकता कमी होते. अशा परिस्थितीत प्रत्येक थेंबाचे नियोजन शास्त्रीय पद्धतीने करणे ही काळाची गरज बनली आहे.

यासाठी केवळ जलसंधारणाची कामे करणे पुरेसे नसते; तर योग्य ठिकाणी, योग्य प्रकारचा आणि योग्य प्रमाणात उपचार करणे आवश्यक असते. हे काम अंदाजावर नव्हे, तर अचूक माहितीच्या आधारेच शक्य होते. काही वर्षांपूर्वी पाणलोट विकासाचे नियोजन करताना प्रत्यक्ष क्षेत्र पाहणी, स्थानिक अनुभव आणि कागदी नकाशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत असे. प्रत्येक विभागाकडे वेगवेगळी माहिती असल्याने सर्व माहिती एकत्र करून सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report – DPR) तयार करण्यासाठी मोठा कालावधी लागत असे. काही ठिकाणी एकाच प्रकारची कामे पुन्हा प्रस्तावित होत, तर काही भाग आवश्यक उपचारांपासून वंचित राहत असे. आज GIS प्रणालीमुळे हे चित्र बदलले आहे. उपग्रह प्रतिमा, डिजिटल एलिव्हेशन मॉडेल, GPS आधारित सर्वेक्षण, मृदेची माहिती, पर्जन्यमान, भू-आकृती, जलप्रवाह, भूजल आणि इतर विविध माहितीचे स्तर (Layers) एकत्र करून त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण केले जाते. परिणामी निर्णय प्रक्रियेला डेटा आणि विज्ञानाचा भक्कम आधार मिळाला आहे. याच कारणामुळे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना : पाणलोट विकास घटक 2.0 मध्ये GIS ला “Digital Brain” असे संबोधले जाते. कारण ही प्रणाली केवळ नकाशे तयार करत नाही; तर संपूर्ण पाणलोट विकासासाठी योग्य निर्णय घेण्यास मदत करते. या संपूर्ण उपक्रमातील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे (Micro Watershed Maps) तयार करून ते विनामूल्य सार्वजनिक वापरासाठी यंत्रणेच्या VSINA या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत. ही केवळ आकड्यांची नोंद नाही; तर राज्याच्या नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाचा डिजिटल पाया आहे. आज कोणताही नागरिक आपल्या गावाचा सूक्ष्म पाणलोट नकाशा https://mhvslna.org/ या संकेतस्थळावर पाहू शकतो, डाउनलोड करू शकतो आणि त्याची प्रिंटही घेऊ शकतो. पूर्वी केवळ तज्ज्ञ आणि शासकीय यंत्रणांपुरती मर्यादित असलेली माहिती आता लोकांच्या हातात आली आहे. यामुळे शासनाची माहिती अधिक पारदर्शक झाली आहे.

# मानकांबाबत विधेयकाच्या अनुषंगाने सूचना पाठविण्याचे आवाहन

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणीसाठी मानकांबाबत विधेयकाच्या अनुषंगाने सूचना, सुधारणा पाठवू इच्छिणाऱ्या नागरिक व संबंधितांनी आपल्या सूचना, सुधारणा तीन प्रतींमध्ये गुरुवार, २० ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय येथे पाठवाव्यात असे विधान मंडळाचे जितेंद्र भोळे यांनी सांगितले आहे.

महाराष्ट्र विधानसभा २०२६ चे विधेयक क्रमांक ५१ –“महाराष्ट्र राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणी करण्यासाठी, अशा आस्थापनांद्वारे ज्या सुविधा व सेवा पुरविण्यात येतील त्यांची किमान मानके विहित करण्याकरिता; आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक “असे त्याचे पूर्ण नाव असून सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांच्या संयुक्त समितीकडे हे विधेयक विचारार्थ पाठविण्यात आले आहे.

विधेयकातील तरतुदींच्या अनुषंगाने राज्यातील जनता तसेच संबंधित विषय क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्था, संघटना, NGOs यांचेकडून सूचना, सुधारणा मागविण्याचा निर्णय समितीने २९ जुलै रोजी झालेल्या बैठकीत घेतला आहे. सूचना, सुधारणा पाठवू इच्छिणाऱ्या नागरिक व संबंधितांनी आपल्या सूचना, सुधारणा तीन प्रतींमध्ये गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा बेताने निम्नस्वाक्षरीत श्री. जितेंद्र भोळे, सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई-४०००३२ यांच्याकडे “सर्वसाधारण” व “खंडनिहाय” या स्वरुपात पाठवाव्यात. अथवा महाराष्ट्र विधानमंडळाच्या “www.mls.org.in” या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या https://mahalegislature.org.in/assembly-bill-51/ या लिंकवर देण्यात आलेल्या गुगल फॉर्म (Google Form) द्वारे युनिकोड फॉन्ट (Unicode Font) मध्ये पाठवता येतील.या विधेयकाच्या मराठी व इंग्रजी प्रती शासकीय ग्रंथागार पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर तसेच व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई-४००००४ यांचेकडे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.तसेच सदरहू विधेयक (मराठी /इंग्रजी) महाराष्ट्र विधानमंडळाच्या उपरोक्त संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे असे सचिव, विधानमंडळ सचिवालय यांनी कळविले आहे.

# थोडक्यात पण महत्त्वाचे



## मुंबई मॅरेथॉन २०२७ नोंदणीचा शुभारंभ

मुंबई : राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत १७ जानेवारी २०२७ रोजी होणाऱ्या टाटा मुंबई मॅरेथॉन स्पर्धेसाठी नावनोंदणी प्रक्रियेचा शुभारंभ आज मुंबई येथे करण्यात आला. मुंबई मॅरेथॉन जगातील सर्वात अधिक स्पर्धक असणारी समावेशक मॅरेथॉन झाल्याबद्दल राज्यपालांनी आयोजकांचे अभिनंदन केले तसेच मॅरेथॉनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमांना चालना दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाला भारतीय नौदलाच्या पश्चिम विभागाचे मुख्य ध्वज अधिकारी व्हाईस ॲडमिरल संजय वात्सायन, महाराष्ट्र, गुजरात व गोवा विभागाच्या सैन्य दलाचे जनरल ऑफिसर कमांडिंग ले. जन. डी एस कुशवाह, मॅरेथॉन आयोजक संस्था प्रोकॅमचे व्यवस्थापकीय संचालक अनिल सिंह, सहसंचालक विवेक सिंह तसेच मॅरेथॉन प्रायोजक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश

यवतमाळ : दारव्हा तालुक्यातील दहेली येथील दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्हा प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन विभागाची तातडीची आढावा बैठक घेत आपत्ती व्यवस्थापनासाठी तत्काळ उपाययोजना करुन सतर्क राहण्याचे तसेच पूरप्रवण भागांसाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. दारव्ह्यातील दहेली दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुध्द बक्षी, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सतीश मुन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे आदी अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी विविध मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच पालकमंत्री संजय राठोड यांनी तत्काळ उपाययोजनांचे निर्देश दिले. ते म्हणाले, दहेली येथील दुर्घटनेची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी. संबंधित ठेकेदार किंवा विभागाचा निष्काळजीपणा आढळल्यास कठोर कारवाई करावी, सुरक्षा नियमांचे पालन झाले का याची तपासणी करुन दोषींवर कारवाई करावी. याबरोबरच पालकमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाला उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. त्यामध्ये पूरप्रवण गावांची अद्ययावत यादी करावी, धोकादायक पूल, रस्ते व नाल्यांचे सर्वेक्षण करा, 24×7 आपत्ती नियंत्रण कक्ष कार्यरत ठेवा, हवामान विभागाच्या इशाऱ्यांची त्वरित माहिती गावागावात पोहोचवा, आवश्यक बचाव साहित्याचा कायमस्वरूपी साठा उपलब्ध करा.

## शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना शासनाचा मोठा दिलासा

रायगड : रायगड जिल्ह्यात महसूल प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने अनेक ऐतिहासिक व महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष आढावा बैठकीत या महत्त्वपूर्ण निर्णयांची घोषणा करण्यात आली. या बैठकीस रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, आमदार रवीशेठ पाटील, सिंधुदुर्गचे आमदार प्रमोद जठार, जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सुनील इंदुलकर, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्यासह सर्व उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनींवर पडलेले ‘वन’ विभागाचे शिक्के तातडीने हटवून शेतकऱ्यांना पूर्ववत मालकी हक्क मिळवून देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला असून, यासंदर्भातील शासन निर्णय (GR) तातडीने जारी केला जाणार आहे.

# विश्वासाच्या नात्याचा गैरफायदा घेऊन पक्षकाराची ₹१० लाखांची फसवणूक

■ बारामती (दै. संध्या)

मोटार अपघातात पतीचा मृत्यू झाल्यानंतर मिळालेल्या नुकसानभरपाईच्या रकमेसंदर्भात पक्षकाराने ज्या वकिलावर विश्वास ठेवला, त्याच विश्वासाचा गैरफायदा घेऊन व्यावसायिक फीपोटी केवळ ₹१ लाख काढण्यात येणार असल्याचे सांगून प्रत्यक्षात स्वतःच्या खात्यावर ₹१० लाख हस्तांतरित केल्याचे न्यायालयीन पुराव्यात सिद्ध झाल्याने, बारामती शहर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक ५३५/२०१९ मधील आरोपी ॲड. बापू बाबुराव दिवेकर यास मा. न्यायालयाने भारतीय दंड संहिता कलम ४२० अन्वये दोषी ठरवून एक वर्ष सक्तमजुरी आणि ₹२५,०००/- दंडाची शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणाचा न्यायालयीन क्रमांक R.C.C. No. 72/2020 असून, मा. टी. डी. इंगवले, न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. ५, बारामती यांनी दि. ३१ जुलै २०२६ रोजी निकाल दिला. न्यायालयाने आरोपीस भारतीय दंड संहिता कलम ४२० अन्वये दोषी ठरविले, तर कलम ४०६, ४६५, ४६८ व ४७१ मधील आरोप आवश्यक स्वतंत्र आणि वैज्ञानिक पुराव्याअभावी सिद्ध झाले नसल्याने त्या आरोपांत आरोपीस संशयाचा लाभ दिला. या प्रकरणातील फिर्यादी बाळासाहेब दत्तात्रय रणसिंग यांच्या पत्नीचा दि. २२ फेब्रुवारी २०१५ रोजी मोटार अपघातातील दुखापतींमुळे मृत्यू झाला होता. त्यानंतर त्यांनी मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, बारामती येथे नुकसानभरपाईचा दावा दाखल केला आणि त्या कामासाठी आरोपी ॲड. बापू बाबुराव दिवेकर यांची वकील म्हणून नियुक्ती केली. फिर्यादीने आपल्या कायदेशीर हक्कांच्या पूर्ततेसाठी आरोपीवर विश्वास ठेवला होता. नुकसानभरपाईची रक्कम प्राप्त झाल्यानंतर फिर्यादी आणि त्यांची मुले अविनाश व तुषार यांच्या संयुक्त नावाने युनियन बँक ऑफ इंडिया, बारामती शाखेत संयुक्त खाते उघडण्यात आले. अभियोग पक्षाच्या म्हणण्यानुसार, आरोपीने वकिली फी आणि न्यायालयीन औपचारिकतेसाठी काही कागदपत्रांवर सह्या आवश्यक असल्याचे सांगून फिर्यादीकडून धनादेश आणि बँक विड्रॉल स्लिपवर सह्या घेतल्या. आरोपीने व्यावसायिक फीपोटी केवळ ₹१,००,०००/- काढण्यात येणार असल्याचे सांगितले होते. मात्र, त्यानंतर फिर्यादीच्या संयुक्त खात्यातून आरोपीच्या वैयक्तिक खात्यावर ₹१०,००,०००/- हस्तांतरित झाल्याचे बँक अभिलेखातून निष्पन्न झाले. या व्यवहाराबाबत फिर्यादीने आरोपीकडे विचारणा केली असता रक्कम परत करण्याचे आश्वासन देण्यात आल्याचेही साक्षीत नमूद झाले; तथापि, रक्कम परत न मिळाल्याने फिर्यादीने पोलिसांत तक्रार नोंदविली.



फिर्यादी आज हयात नसले, तरी त्यांनी सत्यासाठी उचललेले पाऊल व्यर्थ गेले नाही. पुराव्यांच्या बळावर त्यांची तक्रार न्यायालयापर्यंत पोहोचली आणि न्याय अखेर त्यांच्या कुटुंबापर्यंत पोहोचला. हा निकाल नागरिकांना असा विश्वास देणारा आहे की, तक्रारदाराच्या निधनानंतरही सत्य पुराव्यांच्या स्वरूपात जिवंत राहते आणि कायद्याची प्रक्रिया दोषी व्यक्तीपर्यंत पोहोचते.

## बारामती न्यायालयाकडून आरोपी वकिलास एक वर्ष सक्तमजुरी व ₹२५ हजार दंड

"न्यायाला वेळ लागू शकतो; मात्र ठोस पुरावे, प्रामाणिक प्रयत्न, साक्षीदारांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रभावी न्यायालयीन कामकाज असल्यास तक्रारदाराच्या अनुपस्थितीतही न्यायाचा आवाज थांबत नाही," हा संदेश या निकालातून अधोरेखित झाला आहे. फिर्यादीच्या कायदेशीर वारसांना दंडाच्या रकमेतून नुकसानभरपाई देण्याचा आदेश देऊन न्यायालयाने केवळ आरोपीस शिक्षा सुनावली नाही, तर पीडित कुटुंबाच्या आर्थिक आणि मानसिक वेदनेची कायदेशीर दखलही घेतली आहे. मा. न्यायालयाने आरोपी बापू बाबुराव दिवेकर यास भारतीय दंड संहिता कलम ४२० अन्वये एक वर्ष सक्तमजुरी आणि ₹२५,०००/- दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास आणखी तीन महिने साधी कैद भोगण्याचे आदेश देण्यात आले. तसेच दंडाच्या ₹२५,०००/- रकमेतून ₹२०,०००/- फिर्यादीच्या कायदेशीर वारसांना नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आणि उर्वरित ₹५,०००/- शासनजमा करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. सदर प्रकरणामध्ये महिला पोलीस शिपाई सगुणा आवटे यांनी साक्षीदारांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, न्यायालयीन तारखांचे समन्वयन आणि आवश्यक न्यायालयीन कामकाजासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. ए. ए. रणसिंग, श्री. राहुल सोनवणे आणि श्री. होळकुंदे यांनी वेळोवेळी साक्षीदार तपासणे, दस्तऐवजी पुरावे न्यायालयासमोर सादर करणे आणि शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्याचे काम पाहिले. पोलिसांनी नोंदविलेली तक्रार, तपासादरम्यान संकलित व जतन केलेले पुरावे, साक्षीदारांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, अभियोग पक्षाचे प्रभावी न्यायालयीन कामकाज आणि मा. न्यायालयाने केलेले स्वतंत्र व निष्पक्ष पुरावा-मूल्यमापन यामुळे हा निकाल केवळ एका आरोपीस झालेली शिक्षा नसून, नागरिकांचा पोलीस आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करणारा निर्णय ठरला आहे.

अभियोग पक्षाने विविध व्यवहारांद्वारे एकूण ₹१६,१९,४९०/- रकमेबाबत आरोप केला होता. तथापि, न्यायालयाने प्रत्येक व्यवहाराची स्वतंत्रपणे छाननी केली. सर्व व्यवहारांचा लाभ आरोपीस झाला असल्याचा ठोस पुरावा उपलब्ध नसल्याने न्यायालयाने संपूर्ण ₹१६,१९,४९०/- रकमेबाबत दोष सिद्ध झाल्याचे मान्य केले नाही. मात्र, आरोपीच्या वैयक्तिक खात्यावर हस्तांतरित झालेल्या ₹१० लाखांच्या व्यवहाराबाबत मौखिक साक्ष आणि प्रमाणित बँक दस्तऐवज यांचा एकत्रित विचार करून फसवणुकीचा आरोप संशयापलीकडे सिद्ध झाल्याचा निष्कर्ष न्यायालयाने नोंदविला.

सदर गुन्हा दि. ३० जुलै २०१९ रोजी बारामती शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला. तपास पूर्ण करून दि. ३१ डिसेंबर २०१९ रोजी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. न्यायालयाने दि. २७ जानेवारी २०२३ रोजी आरोपीविरुद्ध आरोप निश्चित केले. त्यानंतर अभियोग पक्षाने साक्षीदार तपासून मौखिक व दस्तऐवजी पुरावा न्यायालयासमोर सादर केला. अभियोग पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये फिर्यादी बाळासाहेब दत्तात्रय रणसिंग, अविनाश बाळासाहेब रणसिंग, युनियन बँक ऑफ इंडिया, बारामती शाखेचे तत्कालीन सहाय्यक शाखा व्यवस्थापक ऋषिकेश विलास मोहिते, तुषार बाळासाहेब रणसिंग आणि तपासी अधिकारी पद्मराव रामराव गंपले यांचा समावेश होता. न्यायालयासमोर फिर्याद, फिर्यादी आणि आरोपी यांच्या बँक खात्यांची प्रमाणित विवरणपत्रे, बँक स्लिप्स, धनादेश, संबंधित व्यवहारांची नोंद आणि इतर महत्त्वाची कागदपत्रे पुराव्यात सादर करण्यात आली. युनियन बँकेच्या अधिकाऱ्याने फिर्यादी व त्यांच्या मुलांच्या संयुक्त खात्याचे तसेच आरोपीच्या खात्याचे प्रमाणित खातेविवरण न्यायालयात सादर केले. न्यायालयाने सदर बँक अधिकाऱ्याची साक्ष स्वतंत्र आणि वस्तुनिष्ठ असल्याचे मान्य केले. प्रमाणित बँक अभिलेखांमधून संयुक्त खात्यातून आरोपीच्या खात्यावर ₹१० लाख हस्तांतरित झाल्याचा आर्थिक व्यवहार स्पष्टपणे सिद्ध झाला. न्यायालयाने असेही नमूद केले की, व्यवहारानंतर मोबाईलवर प्राप्त झालेला transaction alert हा व्यवहार करण्यापूर्वी खातेदाराने पूर्ण माहितीने आणि स्वेच्छेने संमती दिली होती, याचा निर्णायक पुरावा ठरत नाही. व्यवहार झाल्यानंतर आलेली माहिती आणि व्यवहारापूर्वी दिलेली स्वेच्छेची संमती या दोन वेगळ्या बाबी असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने फिर्यादीच्या साक्षीचे मूल्यमापन करताना नमूद केले की, फिर्यादीने केवळ ₹१ लाख व्यावसायिक फी म्हणून काढण्यास संमती दिल्याची साक्ष दिली होती, तर प्रत्यक्षात आरोपीच्या वैयक्तिक खात्यावर ₹१० लाख हस्तांतरित झाले. आरोपीने नुकसानभरपाईच्या ५० टक्के रकमेवर व्यावसायिक फीचा अधिकार असल्याचा बचाव घेतला. मात्र, अशा करारास समर्थन देणारा कोणताही लिखित फी करार, पावती, स्वीकृतीपत्र, खातेविवरण, पत्रव्यवहार अथवा इतर विश्वसनीय समकालीन दस्तऐवज न्यायालयासमोर सादर करण्यात आला नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की, धनादेशावरील सही खरी असली तरी ती सही कोणत्या रकमेकरिता आणि कोणत्या उद्देशाने घेण्यात आली, हा स्वतंत्र व अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. एखाद्या व्यक्तीला केवळ ₹१ लाख काढण्यात येणार असल्याचे सांगून सही घेतली आणि त्या सहीचा वापर करून ₹१० लाख स्वतःच्या खात्यावर हस्तांतरित करण्यात आले, तर अशा परिस्थितीत ती सही व्यवहारास दिलेली मुक्त, पूर्ण माहितीवर आधारित आणि स्वेच्छेची संमती मानता येत नाही. या प्रकरणात आरोपीने केलेली खोटी प्रतिमा निर्माण करणारी मांडणी, त्या मांडणीवर विश्वास ठेवून फिर्यादीने दिलेली सही, त्यानंतर झालेला मालमत्तेचा हस्तांतरण व्यवहार, फिर्यादीचे आर्थिक नुकसान आणि आरोपीस झालेला अनुचित आर्थिक लाभ या सर्व बाबी पुराव्यांवरून सिद्ध झाल्याचे न्यायालयाने नमूद केले.

तपासातील काही त्रुटींचीही न्यायालयाने स्पष्ट नोंद घेतली. मूळ वादग्रस्त धनादेश जप्त न करणे, तो हस्ताक्षर तज्ज्ञ अथवा न्यायवैद्यक तज्ज्ञाकडे न पाठविणे, धनादेशावरील कथित फेरफाराचा वैज्ञानिक पुरावा उपलब्ध न करणे आणि व्यवहार प्रक्रिया करणाऱ्या संबंधित बँक अधिकाऱ्याची साक्ष न नोंदविणे या त्रुटी बनावट दस्तऐवजांशी संबंधित आरोपांसाठी महत्त्वाच्या ठरल्या. त्यामुळे कलम ४६५, ४६८ आणि ४७१ अंतर्गत आरोप सिद्ध झाले नाहीत. तसेच, कायदेशीर अर्थाने मालमत्ता आरोपीकडे विश्वासाने सुपूर्द करण्यात आली होती, हे स्वतंत्रपणे सिद्ध न झाल्याने कलम ४०६ मधील आरोपही सिद्ध झाला नाही. मात्र, न्यायालयाने हेही स्पष्ट केले की, तपासातील प्रत्येक त्रुटीमुळे संपूर्ण अभियोग आपोआप कोसळत नाही. ज्या आरोपाबाबत स्वतंत्र, विश्वसनीय आणि कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य पुरावा उपलब्ध आहे, त्या आरोपाचा निर्णय त्या पुराव्यावरच केला पाहिजे. या प्रकरणात प्रमाणित बँक अभिलेख, फिर्यादीची साक्ष, सहसाक्षीदारांची पुष्टी आणि आरोपीच्या खात्यावर झालेल्या ₹१० लाखांच्या हस्तांतरणाचा स्पष्ट पुरावा यामुळे भारतीय दंड संहिता कलम ४२० अंतर्गत फसवणुकीचा आरोप सिद्ध झाल्याचे न्यायालयाने नमूद केले. शिक्षा ठरविताना न्यायालयाने आरोपी आणि फिर्यादी यांच्यातील वकील-पक्षकाराचा विश्वाससंबंध अत्यंत गंभीर मानला. फिर्यादीने आपल्या पत्नीच्या अपघाती मृत्यूनंतर मिळणाऱ्या नुकसानभरपाईच्या कायदेशीर प्रक्रियेसाठी आरोपीवर विश्वास ठेवला होता. आरोपी हा व्यावसायिक विश्वासाच्या स्थानावर होता. त्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन आर्थिक लाभ मिळविण्याचे कृत्य हे केवळ साधे खासगी आर्थिक वादाचे स्वरूप नसून व्यावसायिक विश्वासभंगातून केलेला आर्थिक अपराध असल्याचे न्यायालयाने नमूद केले. अशा प्रकारच्या कृत्यामुळे पीडिताचे आर्थिक नुकसान तर होतेच, परंतु कायदे व्यवसाय आणि न्यायप्रशासनावरील जनतेच्या विश्वासालाही धक्का पोहोचतो, अशी गंभीर नोंद न्यायालयाने केली.

या प्रकरणाला मानवी वेदनेची एक गंभीर किनारही आहे. फिर्यादी बाळासाहेब दत्तात्रय रणसिंग यांचे मार्च २०२६ मध्ये निधन झाले. त्यामुळे त्यांनी स्वतः न्यायालयाचा अंतिम निकाल ऐकला नाही. तथापि, त्यांनी नोंदविलेली तक्रार, न्यायालयात दिलेली साक्ष आणि पोलिसांनी संकलित केलेले बँकिंग व दस्तऐवजी पुरावे निष्फळ ठरले नाहीत. फिर्यादीच्या निधनानंतरही फौजदारी न्यायप्रक्रिया थांबली नाही. पोलिसांनी साक्षीदारांचा पाठपुरावा केला, अभियोग पक्षाने पुरावे न्यायालयासमोर मांडले आणि न्यायालयाने प्रत्येक पुराव्याचे स्वतंत्र व निष्पक्ष मूल्यमापन करून दि. ३१ जुलै २०२६ रोजी आरोपीस शिक्षा सुनावली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अजितदादांच्या जयंतीनिमित्त व गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने साहित्य वाटप

बारामती : दैनिक संध्या

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना वृक्षारोपण व स्वच्छतेची प्रचंड आवड होती. दादांना अभिप्रेत असलेलले वृक्षारोपणाचे काम मुढाळे ग्रामपंचायतीकडुन होत असुन हि कौतुकास्पद बाब आहे असे गौरवोद्गार सोमेश्वर कारखान्याचे अध्यक्ष पुरूषोत्तम जगताप यांनी काढले.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंती व गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून मुढाळे ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच जयपाल साळवे यांच्या पुढाकाराने मुढाळे परिसरात वृक्षारोपण व सोमेश्वर विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेचे पूजन पंचायत समिती सदस्या वैशाली कोकणे,तालुका युवकाध्यक्ष ज्ञानेश्वर पोमणे यांनी केले.या कार्यक्रमाचे आयोजन मुढाळे ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच जयपाल साळवे,उपसरपंच लक्ष्मण दरेकर,सदस्य लालासो जायपत्रे, अक्षय कदम,सुरेश ठोंबरे, गणेश भिसे यांनी केले.यावेळी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान सोमेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आल्याने मुख्याध्यापिका कुलकर्णी यांनी ग्रामपंचायत प्रशासनाचे आभार मानले.दरम्यान दर आठवड्याला एक वॉर्ड प्रमाणे मुढाळे गावात स्वच्छता अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती सरपंच जयपाल साळवे यांनी दिली.

## दुर्गम भागातील विद्यार्थिनींना सायकल वाटप



■ नारायणगाव (दै. संध्या)

दुर्गम भागातील विद्यार्थिनींचा शिक्षणामधील सहभाग वाढावा आणि त्यांचा शाळेचा प्रवास सुलभ व्हावा, या उद्देशाने चैतन्य विद्यालय, गाडगे महाराज विद्यालय आणि सावित्रीबाई फुले विद्यालयातील एकूण ३४ विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम जिल्हा परिषद पुणेच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधीतून राबवण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन चैतन्य विद्यालय ओतूर येथे ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष अनिल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी उपस्थितांना कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. या स्तुत्य उपक्रमासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, तसेच जिल्हा परिषद सदस्या छाया तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे आणि माजी सभापती विशाल तांबे तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य मोहित ढमाले यांच्या प्रयत्नातून हा उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी ह.भ.प. गंगाराम महाराज डुंबरे, प्रदीप गाढवे, रामदास डुंबरे,संतोष तांबे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्या छाया तांबे, प्रशांत डुंबरे,प्रभाकर तांबे, ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष अनिल तांबे, माधवराव डुंबरे, गंगाराम महाराज डुंबरे,मोहित ढमाले ,विशाल तांबे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ, पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत रोहिदास महाराज स्वातंत्र्य, समता व श्रमप्रतिष्ठेचे दीपस्तंभ : रवींद्र किरकोळे

■ पुणे (दै. संध्या)

"संतश्रेष्ठ रोहिदास महाराजांनी भारतीय समाजाला समता, मानवता आणि निर्मळ भक्तीचा कालातीत संदेश दिला.त्यांनी स्त्रीचा सन्मान हा समाजाच्या नैतिकतेचा पाया मानला. मोगलांच्या काळात धर्मांतराच्या प्रवृत्तीला त्यांनी निर्भीडपणे विरोध करत स्वधर्म,स्वाभिमान आणि अध्यात्मिक मूल्यांचे रक्षण केले.

**- निलेश गद्रे, सदस्य, समरसता मंच, महाराष्ट्र व गोवा**

"संतश्रेष्ठ रोहिदास महाराजांनी तत्कालीन विषम सामाजिक व्यवस्थेतील वेदनांना निराशेचे रूप न देता त्या आपल्या वाणीचे, विचारांचे आणि भक्तीचे सामर्थ्य बनविले.त्यांच्या शब्दांतून केवळ एका संताचे जीवन व्यक्त होत नाही,तर शोषित,वंचित आणि श्रमजीवी समाजाच्या वेदनांना आवाज मिळतो.त्यांनी श्रमाला ईश्वरपूजेचे स्थान दिले आणि 'कष्ट हेच खरे वैभव' हा जीवनमंत्र जगासमोर ठेवला.त्यामुळे संत रोहिदास महाराज हे श्रमप्रतिष्ठेचे चिरंतन प्रतीक ठरले,"असे प्रतिपादन अखिल भारतीय सामाजिक समरसता गतिविधीचे सहसंयोजक रवींद्र किरकोळे यांनी केले."श्री महागणेश अधिष्ठान विश्वस्त न्यास,पुणे" (महाराष्ट्र) व "सामाजिक समरसता मंच" महाराष्ट्र गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने संत शिरोमणी सद्गुरू श्री रोहिदास महाराज यांच्या ६५० व्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित "कीर्तन-प्रवचन-व्याख्यान महोत्सव" आणि '६५१ पुष्प समर्पण अभियान' संकल्प समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.न्यू इंग्लिश स्कूलच्या गणेश हॉलमध्ये हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.रवींद्र किरकोळे पुढे म्हणाले,"संत रोहिदास महाराजांच्या दृष्टीने माणसाचे मोठेपण जन्मावर किंवा जातिव्यवस्थेवर नव्हे,तर कर्म, चारित्र्य आणि अंतःकरणाच्या निर्मळतेवर अवलंबून होते.धार्मिक व आध्यात्मिक अधिकार हा बाह्य कर्मकांडात नसून अंतःकरणाच्या शुद्धतेत असतो, हे त्यांनी आपल्या आचरणातून सिद्ध केले.त्यांनी भक्तीला समता, मानवता आणि आत्मसन्मानाची दिशा दिली. त्यामुळे त्यांचे जीवन सामाजिक परिवर्तन आणि आध्यात्मिक क्रांतीचे तेजस्वी उदाहरण ठरते."त्यांनी संत रोहिदास महाराजांच्या स्वातंत्र्यवादी विचारांवरही प्रकाश टाकत सांगितले की,"त्या काळातील पारतंत्र्य,सामाजिक गुलामी आणि अन्यायाविरुद्ध स्वातंत्र्याचा पहिला निर्भय स्वर संत रोहिदासांच्या वाणीतून उमटतो.पराधीन जीवन हे मानवी प्रतिष्ठेला कलंक आहे,अशी त्यांची ठाम भूमिका होती. 'जो पारतंत्र्यात राहतो,तो उपवासालाच पात्र ठरतो' या विचारातून त्यांनी स्वातंत्र्य,आत्मसन्मान आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व अधोरेखित केले."संत रोहिदासांचे साहित्य लोकभाषेत आणि बोलीभाषेत असल्यामुळे ते थेट जनमानसाशी संवाद साधते,असे सांगत त्यांनी त्यांच्या प्रत्येक दोह्यातून समता, श्रमाचा गौरव,भक्तीची निर्मळता आणि सामाजिक न्यायाचा संदेश प्रकट होत असल्याचे नमूद केले."संत रोहिदास महाराज आजही केवळ एका समाजाचे नव्हे,तर संपूर्ण मानवजातीच्या समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाच्या विचारांचे चिरंतन दीपस्तंभ आहेत"असेही त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाची सुरुवात ह.भ.प.मोरेश्वर जोशी चऱ्होलीकर यांच्या संत रोहिदास महाराजांवरील भावस्पर्शी कीर्तनाने झाली.

समरसता गतिविधीचे महाराष्ट्र-गोवा क्षेत्र सदस्य निलेश गद्रे यांनी प्रास्ताविक केले, तर ॲड. आनंद गवळी यांनी संत रोहिदासांच्या विचारांचे समकालीन संदर्भांसह विशेष मार्गदर्शन केले.

# "सायबर सुरक्षा व अंमली पदार्थांपासून दूर राहणे महत्त्वाचे" : श्री. चैतन्य कदम

■ बारामती (दै. संध्या)

आज दिनांक 01/08/2026 रोजी सकाळी 11/00 ते 13/00 वा.चे दरम्यान गदिमा हॉल,विद्यानगरी बारामती येथे बारामती तालुका पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण यांच्या वतीने सायबर अवेअरनेस अनुषंगाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.सदर कार्यक्रमासाठी श्री.चैतन्य कदम मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सो,बारामती उपविभाग बारामती,पोलीस निरीक्षक नारायण पवार,विद्या प्रतिष्ठान कॉलेजचे उपप्राचार्य खोत सर,तसेच एमआयडीसी कंपनीतील व्यवस्थापन तसेच पोलिस पाटील, काही स्थानिक नागरिक, व्यापारी संगठन, एमआयडी प्रतिनिधी, शांतता समिती, ज्वेलर्स असोसिएशन, बँक अधिकारी कर्मचारी तसेच विद्यानगरी येथील आर्ट, कॉमर्स, सायन्स, तसेच इंजिनिअरिंग कॉलेजचे विद्यार्थी असे एकूण 1500 ते 1800 जनसमुदाय उपस्थित होता.




सदर कार्यक्रमात श्री.चैतन्य कदम माननीय उपविभाग पोलीस अधिकारी सो,बारामती उपविभाग बारामती यांनी तसेच पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी जमलेल्या जनसमुदायाला सायबर अवेअरनेस अनुषंगाने खालील प्रमाणे मार्गदर्शन केले. आज आपण अशा विषयावर चर्चा करणार आहोत,जो आज प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाशी निगडित आहे. पूर्वी चोर घरात घुसून चोरी करत असत; पण आजचा चोर तुमच्या मोबाईलमध्ये शिरतो. त्याच्याकडे बंदूक नसते,चाकू नसतो, पण तुमची थोडीशी चूक आणि तुमच्या आयुष्यभराची कमाई काही मिनिटांत गायब होऊ शकते.म्हणूनच आजचा आपला विषय आहे सायबर सुरक्षा आणि सायबर फसवणुकीपासून बचाव.

आज आपल्या हातात स्मार्टफोन आहे. आपण UPI ने पैसे भरतो, ऑनलाइन खरेदी करतो,बँकेची कामे मोबाईलवरून करतो, WhatsApp, Facebook, Instagram वापरतो.या सर्व सुविधा आपल्या जीवनाचा भाग बनल्या आहेत.पण या सुविधांसोबत धोकेही वाढले आहेत.सायबर गुन्हेगार तुमचा चेहरा पाहून फसवत नाहीत,तर तुमचा विश्वास जिंकून फसवतात.

मी तुम्हा सर्वांना एक प्रश्न विचारतो. इथे उपस्थित असलेल्या किती जणांकडे स्मार्टफोन आहे? जवळजवळ सर्वांकडेच आहे. म्हणजेच सायबर गुन्हेगारांचे संभाव्य लक्ष्य आपण सर्वजण आहोत.त्यामुळे सायबर सुरक्षितता ही फक्त पोलिसांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सध्या सर्वात जास्त चर्चेत असलेली फसवणूक म्हणजे डिजिटल अटक (Digital Arrest) काही लोक स्वतःला पोलीस, CBI, ED किंवा RBI अधिकारी असल्याचे सांगतात.ते व्हिडिओ कॉल करतात आणि तुमच्यावर गुन्हा दाखल झाल्याचे सांगून भीती निर्माण करतात.नंतर चौकशीच्या नावाखाली पैसे मागतात.मी स्पष्ट सांगू इच्छितो की, भारतात "डिजिटल अटक" अशी कोणतीही कायदेशीर प्रक्रिया नाही.अशा प्रकारचा फोन आला तर घाबरायचे नाही,पैसे पाठवायचे नाहीत,कॉल बंद करायचा आणि जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा सायबर पोलिसांशी संपर्क साधायचा. दुसरा महत्त्वाचा प्रकार म्हणजे UPI आणि QR Code फसवणूक अनेकदा "तुम्हाला पैसे मिळणार आहेत,हा QR Code स्कॅन करा" असे सांगितले जाते.लक्षात ठेवा, QR Code स्कॅन केल्याने पैसे मिळत नाहीत; उलट तुमच्या खात्यातून पैसे जाऊ शकतात. तसेच UPI PIN हा अत्यंत गोपनीय आहे. तो कोणालाही सांगू नका. तिसरा प्रकार म्हणजे OTP आणि KYC फसवणूक बँकेचा अधिकारी असल्याचे सांगून OTP, PIN किंवा CVV विचारला जातो. लक्षात ठेवा, कोणतीही बँक फोनवर OTP, PIN किंवा CVV विचारत नाही. ही माहिती दिली म्हणजे फसवणूक निश्चित समजा. याशिवाय बनावट लिंक पाठवून माहिती चोरणे, WhatsApp हॅक करणे,सोशल मीडियावर बनावट प्रोफाइल तयार करून पैसे मागणे, ऑनलाइन शॉपिंगमध्ये फसवणूक करणे,नोकरीच्या नावाखाली पैसे उकळणे,जास्त नफ्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करायला लावणे, AnyDesk किंवा TeamViewer सारखे ॲप डाउनलोड करून मोबाईलचा ताबा घेणे,तसेच Sextortion, Matrimonial आणि पार्सल-कुरिअर फसवणूक असे अनेक प्रकार आज घडत आहेत.

यासाठी काही साधे नियम लक्षात ठेवा. OTP, PIN, CVV, पासवर्ड किंवा UPI PIN कोणालाही सांगू नका. कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. QR Code विचारपूर्वकच स्कॅन करा. प्रत्येक खात्यासाठी वेगळा आणि मजबूत पासवर्ड वापरा. Two-Factor Authentication सुरू करा.मोबाईल आणि ॲप्स नियमित अपडेट करा.सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती मर्यादित ठेवा.कोणताही आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी संबंधित व्यक्तीची खात्री करा. आता सर्वात महत्त्वाचा मुद्दा जर तुमच्यासोबत सायबर फसवणूक झाली, तर लाजू नका,घाबरू नका आणि वेळ वाया घालवू नका. ताबडतोब 1930 या राष्ट्रीय सायबर हेल्पलाइनवर फोन करा. राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टलवर तक्रार नोंदवा व्यवहाराचे स्क्रीनशॉट,कॉल रेकॉर्ड,मेसेज आणि इतर पुरावे जतन करा. लक्षात ठेवा,पहिले 24 तास म्हणजे Golden Hour अत्यंत महत्त्वाचे असतात. वेळेत तक्रार केल्यास पैसे गोठवण्याची शक्यता वाढते. "सायबर गुन्हेगार तुमची बुद्धी नाही, तर तुमची घाई आणि भीती यांचा फायदा घेतात.त्यामुळे कोणताही फोन, मेसेज किंवा लिंक आली तर आधी विचार करा,मगच कृती करा सतर्क राहा, सुरक्षित राहा आणि इतरांनाही जागरूक करा."

आपल्या घरातील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांपर्यंत हा संदेश नक्की पोहोचवा.कारण जागरूक नागरिक हाच सायबर गुन्हेगारांविरुद्धचा सर्वात मोठा बचाव आहे.

आपला एकच संकल्प — "सायबर सुरक्षित भारत, सुरक्षित नागरिक." तसेच उपस्थित जनसमुदायाला , अमली पदार्थ बाबत जनजागृती, तसेच डायल 112 चे अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात आले.